# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ९, १९४७ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) उप मुख्यमंत्री**
**(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्यांच्या आधारे पदोन्नती दिल्याबाबत

**(१) * ७१४८ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सन २०१० पासून ते आजतगायत अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांना परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्यांच्या आधारे वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यात येत असून, दूरस्थ शिक्षणाद्वारे नियमबाह्य पध्दतीने बोगस अभियंता पदविका प्रमाणपत्र सादर करून काहीजण महानगरपालिकेत पदोन्नतीने अभियंता पदावर कार्यरत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाची उक्त अधिकारी व कर्मचारी यांनी बोगस प्रमाणपत्र देऊन फसवणूक केलेली असून महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमावली नुसार वर्ग तीन व चारमधील पात्र कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती देण्याची तरतूद असून या नियमाच्या आधारे गेल्या दहा वर्षांत महानगरपालिकेत रखवालदार, मजुर, गवंडी, बिगारी, शिपाई, क्लार्क, आरोग्य निरीक्षक, सर्व्हेअर अशा कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक होण्याची संधी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई) यांच्या आदेशानुसार अभियांत्रिकीसह, वैद्यकीय, कृषी, आरोग्य, हॉटेल मॅनेजमेंट व कायद्याच्या दुरस्थ शिक्षणाला परवानगी नसतानाही अनेक कर्मचाऱ्यांनी परराज्यातील म्हणजेच राजस्थान, केरळ, कर्नाटक, आसाम, सिक्कीम या राज्यातील विद्यापीठांच्या पदव्या मिळविलेल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत यूजीसी आणि एआयसीटीई ने वेळोवेळी आदेश काढून या पदव्या नियमबाह्य असल्याचे स्पष्ट केले असूनही व 'एआयसीटीई' मान्यता नसल्याने या पध्दतीने प्रदान केलेल्या अभियांत्रिकी पदवी, पदविका या नियमबाह्य असल्याने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन नियमबाह्य पध्दतीने पदव्या मिळवून पदोन्नती घेणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, महानगरपालिका सेवा प्रवेश नियमानुसार कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदाकरीता विहित करण्यात आलेल्या निकषाची पूर्तता करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

तथापि, तांत्रिक व अभियांत्रिकी क्षेत्रातील दूरस्थ शिक्षणाद्वारे प्राप्त पदवी/पदविका याबाबत शासन प्राधिकरणांनी जारी केलेले सर्व संबंधित नियम, परिपत्रके व अधिसूचना एकत्रितरीत्या तपासण्यात आले असून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE), विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), Distance Education Council, मानव संसाधन विकास मंत्रालय (MHRD), तंत्र शिक्षण संचालनालय तसेच नगरविकास विभाग यांच्या निर्देशांनुसार Engineering & Technology क्षेत्रातील Diploma, B.E., B.Tech, M.E., M.Tech इत्यादी तांत्रिक पदव्या Distance/ODL पध्दतीने विधीमान्य नसल्याचे स्पष्ट झाल्यामुळे अशा पदव्या पदोन्नती प्रक्रियेसाठी ग्राह्य धरता येत नाहीत. महापालिकेमार्फत दिनांक २७/०१/२०२३ रोजी सर्व विभागांना परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यापीठांमार्फत दूरस्थ शिक्षण किंवा ODL पध्दतीने प्राप्त तांत्रिक पदवी/पदविका स्वीकारल्या जाणार नाहीत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच अभियांत्रिकी व तांत्रिक पदांसाठी येणाऱ्या पदोन्नती प्रस्तावांचे परीक्षण करताना पदोन्नती समितीने AICTE व UGC निर्देशांनुसार संबंधित पदव्यांची पडताळणी करण्यात येत असून दूरस्थ पध्दतीने प्राप्त पदव्या नियमबाह्य मानून असे प्रस्ताव अस्वीकार करण्यात आलेले आहेत.

(४) या प्रकरणी पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्तरावर स्वतंत्र अशी उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात आलेली नाही.

(५) UGC व AICTE मार्गदर्शक सूचनांनुसार दूरस्थ शिक्षण पध्दतीने प्राप्त तांत्रिक पदव्या पदोन्नतीसाठी ग्राह्य न धरता अशा प्रकरणांतील पदोन्नती प्रस्ताव नाकारण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील नगररचना विभागात टी.डी.ओ. (T.D.O. E.E.) व डि.इ.(D.E.) पदे निर्माण करून गैरव्यवहार केल्याबाबत

**(२) * ७६०६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील (जि.ठाणे) नगररचना विभागात टी.डी.ओ. (T.D.O. E.E.) व डि.इ. (D.E.) या पदांना शासन स्तरावर मंजूरी नसताना अनियमितपणे सदर पदे निर्माण करुन त्यामार्फत ११० बांधकामांना मंजूरी देवून टी.डी.आर. (TDR) मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगररचना विभागातील आकृतीबंधामध्ये या पदांचा शासन स्तरावर समावेश नसताना संचालक नगररचनाकार, यांनी त्यांच्या अधिकारकक्षेत सदर पदे भरुन शासनाची फसवणूक करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर पदे रद्द करुन संबंधित संचालक नगररचनाकार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात टी.डी.ओ. (T.D.O.E.E.) डि.इ. (D.E.) अशी कोणतीही पदे निर्माण करण्यात आलेली नाहीत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये १२ कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व २४ उप अभियंता (स्थापत्य) ही पदे मंजूर आहेत. तसेच, त्यांना बांधकाम मंजुरी अथवा TDR मंजुरीचे कोणतेही अधिकार महानगरपालिकेतर्फे प्रदान केले नसल्याने त्यांच्याकडून ११० बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली नाही.
(२) संचालक नगररचनाकार, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी टी.डी.ओ. (T.D.O.E.E.) डि.इ. (D.E.) ही पदे भरलेली नाहीत. त्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) अशी कोणतीही पदे सहायक संचालक नगररचनाकार यांचे स्तरावर भरलेली नसल्याने चौकशी अथवा कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावरील वाहनांचे अपघात टाळण्यासाठी सीसीटीव्हीसह आधुनिक यंत्रणा बसविण्याबाबत

**(३) * ६७६३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर मुंबई ते नागपूर दरम्यान अपघात रोखण्यासाठी वाहनांवर नंबरप्लेटच्या आधारे लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही तसेच वाहनचालकांना गतीबाबत माहिती देणारे स्पष्ट व सुंदर फलक तसेच सहा तासांवरील अंतरावर वेग नियंत्रणासाठी अलार्म सिस्टम वा आधुनिक यंत्रणा बसविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनधारकांसाठी सहा तासांवरील अंतरावर वेग नियंत्रणासाठी अलार्म सिस्टम वा आधुनिक यंत्रणा बसविल्यास वेगाने धावणाऱ्या वाहनांवर तसेच रात्री होणाऱ्या साहित्याच्या चोरीवर नियंत्रण ठेवता येऊ शकेल, सदर आधुनिक यंत्रणेमुळे कंट्रोल रुमला अपघाताचे ठिकाणाची माहिती मिळून अपघातस्थळी पोहचण्यासाठी तात्काळ मदत उपलब्ध होऊ शकेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर वाहनांचा प्रचंड वेग असून वाहन मध्येच थांबविल्यास स्वच्छतागृह, हॉटेलस् व पेट्रोल पंपांचा अभाव, वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी नसलेली आधुनिक यंत्रणा, वाहतूक पोलिसांकडून वाहन धारकांची होत असलेली लूट, तात्काळ वैद्यकीय मदतीचा अभाव इत्यादी सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्ते विकास महामंडळाने प्रत्येक वीस ते तीस किमी अंतरावर स्वच्छतागृहे बांधावीत, तसेच सलग प्रवास करुन थकणाऱ्यांसाठी किंवा रात्री प्रवास करणाऱ्यांसाठी विश्रांती करीता पेट्रोल पंप परिसरात बेंच बांधण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील प्रत्येक जिल्ह्यात वाहनधारकांसाठी दर दोन तासाच्या अंतरावर आवश्यक सुविधा देण्यासह अपघात रोखण्यासाठी सीसीटीव्हीसह दर सहा तासांवरील अंतरावर वेग नियंत्रणासाठी अलार्म सिस्टम वा आधुनिक यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर वाहतूक नियंत्रण करण्यासाठी व अपघात टाळणेसाठी ITS (इंटेलिजेंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम) यंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. वेग नियंत्रणासाठी सदर यंत्रणेअंतर्गत महामार्गाच्या दुतर्फा दर १० कि.मी. अंतरावर आधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे. महामार्गावर वाहनचालकांना गतीबाबत माहिती देण्यासाठी IRC मानकाप्रमाणे फलके उभारण्यात आलेली आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

इंटेलिजेंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीमअंतर्गत वेग नियंत्रणासाठी आधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. तसेच ठिकठिकाणी लावण्यात येणाऱ्या कॅमेरामुळे अपघात स्थळी तातडीने पोहचण्यासाठी तसेच चोरीच्या घटनेचे कॅमेरामध्ये चित्रण होऊन चोरीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे.
(३), (४) व (५) समृध्दी महामार्गावर २२ परिपूर्ण मार्ग सुविधा व ७ स्वतंत्र इंधनस्थानके नियोजित असून त्या विकसित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत परिपूर्ण मार्ग सुविधामधील १५ इंधन स्थानके व स्वतंत्र ७ इंधन स्थानके मिळून एकूण २२ ठिकाणी इंधन स्थानके कार्यरत आहेत. त्या ठिकाणी चहा, पाणी, इतर खाद्यपदार्थ व BPCL/HPCL/IOC या कंपन्यानी स्वच्छतागृहांची व बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त २१ इंधनस्थानकांच्या ठिकाणी महामंडळाकडून प्रत्येकी २० अशा ४२० अतिरिक्त FRP स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत मुंबईहून नागपूरच्या दिशेने जाताना मऱ्हळ, डवाळा, वरझडी, मांडवा, रेनकापुर व नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाताना वरझडी, मऱ्हळ व आमणे या ८ ठिकाणी तात्पुरत्या हॉटेल्सची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

सदर महामार्गावर पोलीस व आर.टी.ओ. यांच्यामार्फत अपघात होऊ नये यांसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनचालकांना वेळोवेळी समुपदेशन केले जाते. तसेच इंटरसेप्टर व्हेईकल (Interceptor Vehicle) द्वारे वाहनांचा वेग मोजून, वेग मर्यादा न पाळणाऱ्या वाहन चालकांवर दंड आकारणी करून रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यात येतो. सदर महामार्गावर आवश्यक दिशादर्शक चिन्हे, सूचना फलके, माहिती फलके, घोष फलके, वेगमर्यादा दर्शक फलके लावणे, लेन मार्किंग करणे, कॅटआईज व डेलिनेटर्स, रम्बलिंग स्ट्रीप्स लावणे इ. उपाययोजना केलेल्या आहेत.

तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी अत्याधुनिक शिघ्र प्रतिसाद वाहने (QRV) - २१ नग, रुग्णवाहिका – २१ नग, ई.पी.सी. (EPC) गस्त वाहने - १६ नग, महामार्ग सुरक्षा पोलीस केंद्रे - १५, ३० टन क्षमतेची क्रेन – १६ नग, महामार्गाच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत १९२ सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहेत. महामंडळाकडून, महामार्ग सुरक्षा पोलिसांना १५ वाहने खरेदी करून देण्यात आलेली आहेत.

तसेच वरील नमूद केलेल्या २१ रुग्णवाहिका १०८ (आपत्कालीन वैद्यकिय सेवा) शी जोडलेल्या आहेत. याव्यतिरिक्त समृध्दी महामार्ग ज्या जिल्ह्यामधून जात आहे त्या सर्व जिल्ह्यांमधील मिळून आपातकालीन वैद्यकीय सेवेच्या एकूण २८७ रुग्णवाहीका सदर महामार्गासाठी आपातकालीन परिस्थितीमध्ये उपलब्ध असतात.

महामार्गावर प्रवास करताना वाहनचालक / प्रवाशांना तातडीने मदत मिळण्याकरीता हेल्प लाईन नंबर - ८१८१८१८१५५ (मोबाईल नंबर) - १८००२३३२२३३ (टोल फ्री) दर्शविणारे फलक लावण्यात आले आहे.

वेग नियंत्रणासाठी ITS यंत्रणेअंतर्गत महामार्गाच्या दुतर्फा दर १० कि.मी. अंतरावर VIDESC (Video Incident Detection and Enforcement System) ही आधुनिक प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या परिसरातील भटक्या श्वानांच्या नियंत्रणाची जबाबदारी शिक्षकांवर सोपविण्यात आल्याबाबत

**(४) * ७५४३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, ॲड.अनिल परब, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बसथांबे आदी सार्वजनिक ठिकाणी भटक्या श्वानांना हटवून नियोजित निवारा केंद्रे तयार करून श्वानाना केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण संस्थांना मुंबई शहरात वाढते भटके श्वान रोखण्यासाठी युजीसीने उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले असून त्याबाबतची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शिक्षण विभागाकडे शासकीय विद्यापीठे, अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत त्याशिवाय कर्मचाऱ्यांची संख्याही कमी असताना अतिरिक्त कार्यभाराचा ताण देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आदेशाच्या अंमलबजावणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शाळा परिसरात भटक्या श्वानांचा वावर रोखण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपवून प्रत्येक शाळेत एका शिक्षकाची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश शिक्षण निरीक्षकांनी निर्गमित केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षकांकडून शाळेच्या परिसरातील भटक्या श्वानांची संख्या, संरक्षण भिंती, प्रवेशद्वार, कचरा व्यवस्थापन, श्वान चावल्यास प्रथमोपचार व खबरदारीबाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शालेय शिक्षण देणे हे शिक्षकांचे मुख्य कर्तव्य असताना भटक्या श्वान नियंत्रण, स्वच्छता व सुरक्षा यांसारखी शिक्षणबाह्य व धोकादायक जबाबदारी शिक्षकांवर टाकण्यात आल्यामुळे शिक्षक संघटनांमध्ये तीव्र नाराजी असल्याची बाब निदर्शनास आली असून, सदर आदेशाबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(७) असल्यास, शिक्षकांवरील शिक्षणाशी संबंध नसलेल्या जबाबदाऱ्या तात्काळ मागे घेऊन भटक्या श्वान नियंत्रणासाठी महानगरपालिका स्तरावर स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सुमोटो याचिका क्र. २५/२०२५ बाबत आदेश दिले आहेत.
(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२५ च्या आदेशान्वये सर्व शैक्षणिक संस्था, क्रीडा संकुले, रुग्णालये, बस स्थानके आगार (आंतरराज्यीय बस टर्मिनल्स), रेल्वे स्थानके या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या श्वानांचे निर्बिजीकरण व लसीकरण करुन त्यांना श्वान निवारा केंद्रामध्ये (Dog Shelter) स्थलांतरीत करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
(४), (५) व (६) हे खरे नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेट्रो मार्ग - ४ च्या मार्गीकेवरील सहा उन्नत स्थानकांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत

**(५) * ७१६५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबईतील लोकल ट्रेन वरील भार कमी करणाऱ्या व मुंबई-ठाण्याच्या प्रवाशांसाठी कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या मेट्रो ४ या वडाळा ते कासारवडवली मार्गाच्या सहा उन्नत स्थानकांच्या कामांसाठी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये निविदा मागविण्यात आल्या, परंतु सदर निविदांवर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा टेंडर उघडून पात्र संस्थेला सदर काम देणे अपेक्षित असताना तसे न करता उक्त निविदा प्रक्रियेवर अद्यापर्यंत कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबई-ठाण्याच्या प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मेट्रो ४ या वडाळा ते कासारवडवली मार्गाच्या सहा उन्नत स्थानकांच्या मार्गाचे बांधकाम तातडीने सुरु व्हावे याकरीता प्रलंबित असलेली निविदा प्रक्रिया पुनश्च राबवून पात्र संस्थेस काम मिळावे या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मुंबई मेट्रो मार्ग-४ (वडाळा ते कासारवडवली) या ३२.३२ कि.मी. लांबीच्या मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे करण्यात येत असून सदर मार्गिकेचे काम एकूण ५ पॅकेज मध्ये करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाचे एकूण ८९.३४% इतके भौतिक काम पूर्ण झाले आहे. प्रश्नात नमूद केलेल्या ६ स्थानकांची आर्किटेक्चरल फिनिशिंगची कामे सी ए -२९० या पॅकेज अंतर्गत हाती घेण्यात आली असून त्या बाबतची निविदा माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक २७/१०/२०२५ रोजी पाच निविदा धारकांपैकी ४ निविदा धारक अंतिम करण्यात आले आहेत. दरम्यानच्या कालावधीत गांधीनगर स्थानकाची मेट्रो मार्ग-६ च्या स्थानकाशी जोडणी करुन सदर स्थानक आयकॉनिक स्थानक म्हणून विकसित करावयाचे असल्याने सदर स्थानकाच्या परिमाण व अंदाजपत्रकात बदल झाला आहे. त्यास मान्यता देण्याची प्रक्रिया सुरु असून लवकरच या सर्व स्थानकांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## भांडेवाडी (जि.नागपूर) येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रांचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) * ७२२३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेद्वारा भांडेवाडी डम्पिंग यार्ड परिसरातील (जि.नागपूर) दहा एकर जागेवर ग्रीन एनर्जी इनव्हरोकेअर एल.एल.बी. कंपनीद्वारे नवीन घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात दररोज १३०० मे. टन कचरा निर्माण होत असून यापैकी सध्या ८०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असून सदर कंपनीद्वारे ५०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे तसेच सर्व जमा असलेल्या नवीन व जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता संबंधित कंपनी सक्षम असल्याची तपासणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनीच्या माध्यमातून भांडेवाडी कचरा संकलन प्रक्रिया केंद्रात कचऱ्याचे ढिगारे कमी होऊन जागा मोकळी झाल्यास आगीच्या दुर्घटना टाळता येतील, अस्वच्छतेमुळे उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचे निराकरण होईल याकरीता सदर केंद्राचे पूर्ण क्षमतेने काम सुरु व्हावे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

भांडेवाडी, नागपूर येथे येणाऱ्या कचऱ्यापैकी प्रक्रीया करण्याकरीता १० एकर जागेवर मे. भूमी ग्रीन एनर्जी, पुणे या कंपनीमार्फत प्रतिदिन ७०० मे. टन क्षमतेचे नवीन घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले असून ते दिनांक १४ जानेवारी, २०२६ पासून सुरू आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

नागपूर शहरातून दररोज १३०० ते १४०० मे. टन नव्या घनकचऱ्याची निर्मिती होते. नवीन कचऱ्यावर प्रक्रीया करण्याकरीता मे.सुसबिडी एलओसी व मे.भूमी ग्रीन एनर्जी या दोन कंपन्यांचे प्रत्येकी ५००±१०% मे. टनचे प्रक्रिया केंद्र सुरु आहेत. या दोन्ही प्रक्रीया केंद्रांमधून प्रतिदिन सुमारे ९०० ते १००० मे.टन नव्या घनकचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. या केंद्रामध्ये ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन आरडीएफ (refuse derived fuel), पुनर्वापराचे मटेरीयल, सी. ॲण्ड डी. वेस्ट (construction and demolition waste) इत्यादीची विल्हेवाट करण्यात येत आहे. जुन्या कचऱ्यावर मे. झिग्मा ग्लोबल इनवायरन सोल्युशन्स प्रा. लि. या कंपनीद्वारे बायोमायनिंग प्रक्रिया सुरू आहे. याकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारे या कंपन्या आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या पात्र असल्याची खातरजमा करण्यात आली आहे.
(३) भांडेवाडी येथील १५.३० लक्ष मे. टन जुन्या कचऱ्यावर मे.झिग्मा ग्लोबल इनवायरन सोल्युशन्स प्रा.लि. या कंपनीद्वारे बायोमायनिंग प्रक्रिया सुरू असून कंपनीद्वारे ९.५० लक्ष मे.टन कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून उर्वरीत कचऱ्यावर सन २०२७ पर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजित आहे. यामुळे ९ एकर जागा मोकळी होणार आहे. तसेच भांडेवाडी येथे ३० एकर जागेवर १०००±२०% मे. टन नवीन कचऱ्यावर प्रक्रीया करण्याकरीता कॉम्प्रेस बायोगॅस प्लांटचे काम प्रगतिपथावर आहे. मे, २०२६ पर्यंत सदर प्रक्रिया केंद्र सुरु करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई - गोवा महामार्गावरील महाड (जि.रायगड) येथील गांधार पाले लेण्याजवळील विश्रांती परिसर इमारतीचे मद्यपींनी नुकसान केल्याबाबत

**(७) * ७४११ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा महामार्गावरील महाड (जि.रायगड) येथील गांधार पाले लेण्याजवळ असलेला विश्रांती परिसर (रेस्ट एरिया) मद्यपींचा अड्डा बनला असून, मद्यपींकडून उक्त इमारतीचे दरवाजे तोडणे, स्वच्छतागृह आणि स्नानगृहातील नळ तोडून नेणे असे प्रकार घडल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावर अद्यापही अनेक कामे अपूर्णावस्थेत असून मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावरील महाड (जि.रायगड) तालुक्यातील गांधार पाले लेण्याजवळ असलेल्या विश्रांती परिसरात मद्यपींकडून होणारे सदर इमारतीचे नुकसान टाळण्यासाठी इमारतीत सुरक्षा रक्षक ठेवण्याबाबत तसेच सदर इमारतीची दुरुस्ती करुन मद्यपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ची महाराष्ट्र राज्यातील एकूण लांबी ४७१.३० कि.मी. असून त्यापैकी ०/०० (पळस्पे) ते कि.मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व कि.मी. ८४/०० (इंदापूर) ते कि.मी. ४७१/३० (पात्रादेवी) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत करण्यात येत आहे. गांधार पाले लेण्याजवळील विश्रांती परिसर (रेस्ट एरिया) हा मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील चौपदरीकरणाचे कामांतर्गत विकसित केलेला आहे. चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून करारानुसार दोषदायित्व कालावधीत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार यांचेकडे आहे. इमारतीच्या काही भागांमध्ये किरकोळ तोडफोड झाल्याचे आढळून आले आहे.

(२) मुंबई-गोवा महामार्गावरील महाड तालुक्यातील कि.मी. ११०/७५० ते कि.मी. १५४/३०० (एकूण ४३.५५ कि.मी.) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून काही ठिकाणी सुशोभीकरण / पूरक सुविधांची कामे प्रगतीत आहेत. तथापि, सदर ठिकाणी वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

(३) सदर प्रकरण निदर्शनास आल्यानंतर संबंधित कंत्राटदार यांनी दिनांक १६/१२/२०२५ रोजी महाड पोलीस विभागास याबाबत लेखी कळविले असून संबंधित व्यक्तींवर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

तोडफोड झालेल्या भागांची दुरुस्ती संबंधित कंत्राटदारामार्फत सुरु करण्यात आली आहे. याशिवाय, विश्रांती परिसरात भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या सुरक्षाविषयक उपाययोजना जसे की सुरक्षा रक्षक नेमणूक, देखरेख वाढविणे इत्यादी बाबीं उपलब्ध करून देण्याबाबत कंत्राटदारास निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाळुज ते लांझी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(८) * ६६६५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळुज ते लांझी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) या रस्त्याचे काम सन २०२३ मध्ये मंजूर झाले असून वाळुज औद्योगिक परिसरातून जाणारा तसेच नारायणपुर, पिंपरखेडा, रांजणगांव, गाढेगांव, चित्तेगांव फाटा बिडकीन इत्यादी गावांना जोडणाऱ्या ह्या प्रमुख रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावर प्रवास करणे अत्यंत धोकादायक झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, कामगार, विद्यार्थी व औद्योगिक वसाहतीत काम करणारे कर्मचारी उक्त मार्गावरुन नियमित ये-जा करीत असून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अनेक अपघात झाले असूनही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळुज ते लांझी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) या मंजूर रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर रस्त्यावर अपघात झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) वाळुज ते लांझी या एकूण २.८ कि.मी. लांबीपैकी १.९ कि.मी. लांबीमध्ये सिमेंट कॉँक्रिटीकरण व मंजबूतीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित लांबीतील काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील क्रीडा मैदानांवर महिला खेळाडूंसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत

**(९) * ६५७८ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडा मैदानांवर विशेषत: महिला खेळाडूंसह नोकरदार महिलांसाठी प्राधान्याने पुरेशी स्वच्छतागृहे निर्माण करण्याबाबत मा.लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी शासनास दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निदेशानुसार अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली ‘विशेष चौकशी पथक’ (एआयटी) स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार सदरहू विशेष चौकशी पथकाने (एआयटी) राज्यातील मैदानांची संकलित माहिती शासनास सादर केली आहे काय, सदरहू माहितीचा थोडक्यात तपशील काय आहे,
(३) असल्यास, राज्यातील बहुतांश क्रीडांगणांवर स्वतंत्र सुरक्षित चेंजिग रुम नसल्याने तसेच अस्वच्छ स्वच्छतागृहांमुळे आरोग्यविषयक समस्या उद्भवत असून खेळाडूंना स्पर्धांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील सर्व तालुका, जिल्हा, विभागीय क्रीडा संकुल, जिमखाने आणि स्पोर्ट्स क्लब या स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करुन महिला खेळाडूंसाठी प्रत्येक जिल्हा, तालुका आणि स्थानिक क्रीडांगणावर स्वतंत्र स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा आणि सुरक्षित चेंजिंग रूम्स उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

मा.लोकआयुक्त यांच्या निर्देशानुसार दिनांक ०८ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष चौकशी पथक गठीत करण्यात आले आहे.
(२) सदर प्रकरण मा.लोकआयुक्त यांच्याकडे दाखल असून त्यावर सुनावणी सुरु आहे.
(३) व (४) मा.लोकआयुक्त यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने, क्रीडा विभाग, ग्रामविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, नगरविकास विभाग व मुंबई मधील मैदानांकरीता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, तसेच तज्ञ वास्तुविशारद यांच्याशी समन्वय साधून महिला क्रीडापटूंसाठी प्राधान्याने पुरेशी स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहे उभारणे, विद्युत व्यवस्था करणे व इतर बाबींसंदर्भात पर्याय तपासण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील अमृत पाणीपुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१०) * ७२७३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरासाठीच्या अमृत पाणीपुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्यातील ११ जलकुंभ आणि जलवाहिनीचे काम अद्यापही अपूर्ण असल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून वारंवार मिळणाऱ्या मुदतवाढीमुळे योजनेचा खर्च १५ कोटी रुपयांनी वाढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील भुसावळ शहरातील जुन्या व जीर्ण जलवाहिन्यांची १०० पेक्षा जास्त ठिकाणी गळती होत असून त्यामुळे दररोज हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होत असून अमृत पाणीपुरवठा योजनेची ३० अपूर्ण कामे व जलकुंभ कार्यान्वित न झाल्यामुळे नागरिकांना १० ते १२ दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुसावळ हे रेल्वे जंक्शन असून ऑर्डनन्स फॅक्टरी, दीपनगर औष्णिक वीज केंद्र, वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी यासारख्या महत्वाच्या औद्योगिक संस्था या ठिकाणी आहेत, या शहरात पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भुसावळ नगरपालिकेंतर्गत कार्यरत जलशुध्दीकरण केंद्र जुने असल्याने नियमित पाणीपुरवठा करणे कठीण जात आहे, परंतु अमृत योजना एक व दोन चे काम पूर्ण झाल्यावर शहराला नियमित पाणीपुरवठा होईल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी वर्षभरात पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत दिलेल्या आश्वासनानुसर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच जुन्या जलवाहिन्या बदलण्यासाठी आणि अमृत योजनेचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत १ अभियानंतर्गत भुसावळ शहराच्या रुपये ९०.८४ कोटी पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी दिनांक २२ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आली होती.

योजनेच्या या टप्प्यात समाविष्ट कामामधील एकूण ११ जलकुंभापैकी ८ जलकुंभाचे RCC व पाईप असेब्लीचे काम पूर्ण झाले आहे, तसेच, १९८.३८५ कि.मी. वितरण व्यवस्थेपैकी १९३.०२७ कि.मी. वितरण व्यवस्था टाकण्यात आलेली आहे.

तथापि, योजनेतील सर्व उपांगांची कामे पूर्ण न झाल्याने व योजना दीर्घकाळ अपूर्ण राहिल्याने शासन स्तरावरून आढावा घेऊन योजना पूर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक पूर्तता व विलंबाबाबत जबाबदारी निश्चिती / कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने नगरपरिषदेमार्फत संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्यात आले आहे व प्रकल्पाचे काम आहे त्या स्थितीत बंद करण्यात आले आहे.
(२) भुसावळ शहराची सध्याची वितरण व्यवस्था पीव्हीसी प्रकारच्या पाईप्सची आहे व ती काही प्रमाणात जीर्ण झाल्यामुळे शहरात जलवाहिनीची गळती होत असते. तथापि, नगरपरिषदमार्फत प्राथम्याने दुरुस्तीचे कामे करून पाण्याचा अपव्यय कमीत कमी राखण्यात येतो. तसेच, तांत्रिकदृष्ट्या यंत्रणेमध्ये बिघाड झाल्यास अथवा विद्युत पुरवठा खंडित झाल्यास पाणीपुरवठा विस्कळीत होतो ही वस्तुस्थिती आहे. तथापि, नागरिकांची पाण्याची गरज भागविण्याकरीता नगरपरिषद मालकीच्या विहिरीमधून पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच, नागरिकांच्या खाजगी विंधन विहिरी सुद्धा उपलब्ध आहेत.
(३) भुसावळ ही रेल्वे जंक्शन असून रेल्वेची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना आहे. तसेच, ऑर्डनन्स फॅक्टरी (वरणगांव व भुसावळ), दीपनगर औष्णिक वीज केंद्र या संस्था भुसावळ नगरपरिषदेच्या हद्दीत नसल्यामुळे त्यांना नगरपरिषदमार्फत पाणीपुरवठा करण्यात येत नाही.
(४), (५) व (६) भुसावळ नगरपरिषद क्षेत्रातील विद्यमान जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता तत्कालीन लोकसंख्या विचारात घेऊन अस्तित्वात असून सदरची यंत्रणा आजच्या लोकसंख्येच्या तुलनेने कमी असल्यामुळे शहरास नियमित पाणीपुरवठा करण्यास अडचणी आहेत ही वस्तुस्थिती आहे.

अमृत अभियानांतर्गत मंजूर पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम आहे त्या स्थितीत बंद करण्यात आलेले असून राहिलेल्या कामांचे सुधारित खर्च अंदाजाबाबत नगरपरिषद मार्फत कार्यवाही सुरू आहे.

भुसावळ शहराची पाणीपुरवठ्याची गरज विचारात घेता केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत रुपये १३६.७४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून सदर प्रकल्पात इंटेक वेल, जॅक वेल, रॉ वॉटर पंपिग मशिनरी, रॉ वॉटर राइझिंग मेन, जलशुध्दीकरण केंद्र, वितरण व्यवस्था, एक उंच पाण्याची टाकी इ. उपांगांचा समावेश असून आजमितीस प्रकल्पाची ४६% भौतिक प्रगती झाली असून अमृत आणि अमृत २.० अभियानंतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पातील उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतर शहरास नियमित पाणीपुरवठा करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## मुंबईतील कोळी समाजाच्या मासे सुकविण्यासाठीच्या राखीव जमिनीला झोपडपट्टी म्हणून घोषित केल्याबाबत

**(११) * ७०८१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कोळी समाजाकडून मासे सुकविण्यासाठी पिढ्यांपिढ्या वापरल्या जात असलेल्या राखीव जमिनीला झोपडपट्टी म्हणून घोषित करण्याच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) आदेशाला मच्छीमार कल्याण संघटनेने आव्हान देत नाराजी व्यक्त केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खार-दांडा कोळी समाजाच्या उपजीविकेचे मासेमारी हे मूळ साधन असून त्यांच्या सांस्कृतिक व आर्थिक आधाराचे ते एक मुख्य साधन आहे त्यामुळे या जमिनीवरील अतिक्रमण दूर करून मासे सुकविण्याची जमीन पुन्हा मच्छीमारांना देण्याची मागणी कोळी समाज बांधव करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उपनगरातील खार-दांडा कोळीवाड्यातील शासकीय मालकीच्या जमिनीवरुन मासेमारी सहकारी संस्था आणि झोपडपट्टी पुनर्वसन संस्थेतील वाद शासनाने स्वतःच हस्तक्षेप करुन निराकरण करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) दिनांक १७/१२/२०२५ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (नगरविकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने दोन्ही पक्षकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले असून दिनांक ०३/०२/२०२६ रोजी समितीने प्रत्यक्ष स्थळपाहणी केली आहे. मा.उच्च न्यायालयामध्ये पुढील सुनावणी दिनांक २३/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आली असून न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या शासकीय निवासस्थानाच्या दुरुस्ती व अन्य कामांकरीता नियमबाह्य कंत्राट दिल्याबाबत

**(१२) * ६९१२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या शासकीय निवासस्थानी प्रसाधनगृहाची दुरुस्ती, इमारतीचे दरवाजे, खिडक्या,रेलींग, टेरेसच्या भागात वॉटर प्रुफिंग व मागील बाजुस लादया बसविणे, रंगकाम, जुने व नादुरुस्त फर्निचरची दुरुस्ती, लाकडी पार्टीशन व्हीनॉईल फ्लोअरींग व इतर कामांकरीता तीन कंपन्यांना बेकायदेशीरपणे कामे देण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५ कलम २(२) अन्वये ठराव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीन कंपन्या १) मे.सुमीत विलास बागड यांना रुपये १५ लाख ४८ हजार ६७०/- खर्च २) मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन रु २४ लाख ९२ हजार ५९०/- खर्च ३) मे.देवा इंटरप्रायजेस या कंपनीने ८ लाख ५० हजार ५०३/- इतका खर्च उपरोक्त कामांकरीता देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय कामाकरीता रुपये ५० लाख इतका खर्च होणार असतानाही निविदा प्रक्रिया न राबविता बेकायदेशीर ठराव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामाकरिता निविदा प्रक्रिया न राबविण्यामागची कारणे काय आहेत, उपरोक्त कामांकरीता मंजूर केलेली रक्कम अवाजवी असल्याचे निदर्शनास आलेले असून याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणारे सेवानिवृत्त तसेच विदयमान शहर अभियंता यांची चौकशी करुन तात्काळ निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानाची इमारत ही ३० वर्षापूर्वीची असल्याने तसेच, सन २०२३ च्या पावसाळ्यात झालेल्या गळतीमुळे खराब झालेले इमारतीचे फर्नीचर व रंगकाम तातडीने करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील अनुसूची ‘ड’ प्रकरण ५ कलम २(२) मधील तरतुदीनुसार ठराव पारित करण्यात आलेला आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर कामांना रीतसर प्रशासकीय मान्यता घेऊन जाहीर निविदा मागविणे, निविदा मंजूरी नंतर कार्यादेश देणे ह्या बाबीकरीता लागणारा कालावधी दीर्घ स्वरूपाचा असल्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांजूरमार्ग येथील कचराभूमीतून येणाऱ्या दुर्गंधीवर करावयाच्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१३) * ६५६५ श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांजूरमार्ग कचराभूमीतून सातत्याने येणारी दुर्गंधी, धूर यांमुळे होत असलेल्या वायू प्रदूषणामुळे परिसरातील रहिवाशांना श्वसनविकार व त्वचारोगांसारख्या आजाराना सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पूर्व उपनगरातील कांजुरमार्ग येथील महानगरपालिकेच्या कचराभूमीतील कचऱ्याची दुर्गंधी दिवसेंदिवस वाढत असून कांजुरमार्ग, भांडूप, विक्रोळी येथील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून मा.उपमुख्यमंत्री महोदय यांच्या अखत्यारितील समितीमार्फत सदर समस्येवर करण्यात आलेल्या उपाययोजनांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून सदर पाहणी अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयात याबाबत दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांवर दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान 'स्वच्छ हवेत श्वास घेणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून ती काळाची गरज आहे', असे निरीक्षण नोंदविले असून संबंधित यंत्रणांना 'कांजूरमार्ग कचराभूमीतून येणाऱ्या दुर्गंधीवर तसेच प्रदूषणावर तात्काळ तातडीच्या आपत्कालीन उपाययोजना करण्याचे आदेश महानगरपालिका प्रशासनास माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील विक्रोळी आणि कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंडकडे जाणारा कचरावाहक ट्रक व कॉम्पेक्टर वाहनांमधून अनेकदा ओला व सुका कचरा रस्त्यावर पडत असून ही वाहने मुख्य रस्त्यांवरून जात असल्याने वाहतूककोंडी, दुचाकीचालकांना व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघातांचा धोका आणि प्रदूषणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०११ पासून कचराभूमी सदर जागी असून मुंबईत दररोज सात हजार मेट्रीक टन कचऱ्यापैकी ९० टक्के म्हणजेच ६००० हजार मेट्रीक टन कचरा कांजूरमार्गच्या कचराभूमीवर टाकला जात असून त्यापैकी केवळ १००० मेट्रीक टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली जात असल्याने उर्वरीत कचरा त्याच जागेवर साचत जाऊन कचऱ्याचे ढीग तयार झाले असून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदारांच्या कराराचा फेरविचार करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील सगळा कचरा कांजूरमार्गच्या कचराभूमीवर टाकला जात असून मा.उच्च न्यायालयाने संबंधित यंत्रणांना 'कांजूरमार्ग कचराभूमीतून येणाऱ्या दुर्गधीवर तसेच प्रदूषणावर तात्काळ आपत्कालीन उपाययोजना करण्याच्या दिलेल्या आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत तसेच मा.उपमुख्यमंत्री यांच्या अखत्यारितील समितीमार्फत सदर डम्पींग ग्राऊंडच्या प्रत्यक्ष पाहणी अहवाल काय नमूद करण्यात आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत उच्चाधिकार समितीने दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी कांजूर नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी केली. पाहणी दरम्यान सदर समितीने तात्पुरत्या स्वरुपातील उपाययोजना यामध्ये बायो-एंन्झाईम फवारणीचे क्षेत्र व वारंवारीता वाढविणे, मिस्टींग चे नेटवर्क वाढविणे इत्यादी उपयायोजना सुचविल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) मुंबईत दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी ९० टक्के कचरा कांजूरमार्गच्या कचराभूमीवर टाकला जातो, सदर कचरा बंदिस्त कॉम्पेक्टरमधून डम्पिंग ग्राऊंडकडे नेला जातो. ओला व सुका कचरा रस्त्यावर पडू नये याकरीता दक्षता घेण्यात येते. बंदिस्त कॉम्पेक्टरची मुख्य रस्त्याऐवजी सेवा रस्त्याद्वारे जास्तीत जास्त वाहतूक केली जाते.

(५) हे खरे नाही.

(६) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत उच्चाधिकार समितीने दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी कांजूर नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी केली. पाहणी दरम्यान सदर समितीने तात्पुरत्या स्वरुपातील उपाययोजना यामध्ये बायो-एंन्झाईम फवारणीचे क्षेत्र व वारंवारीता वाढविणे, मिस्टींग चे नेटवर्क वाढविणे इत्यादी उपयायोजना सुचविल्या आहेत. तसेच शासनाद्वारे भारतीय प्रशासन सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी व या विषयातील तज्ञ यांची मॉनिटरिंग कमीटी गठीत करण्यात आली आहे. या समितीस उपाययोजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासणे, अंमलबजावणीची कालमर्यादा निश्चित करणे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन वैज्ञानिक व तांत्रिक सुधारणा सुचविणे व त्रुटी आढळल्यास कंत्राटदारावर कारवाई सुचविणे ही कार्यकक्षा निश्चित केली आहे. यानुसार समितीची कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिधापत्रिकाधारकांना दर्जेदार अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत

**(१४) * ६६२८ डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर तहसिल कार्यालयांतर्गत (जि.भंडारा) अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत कस्टम मिल्ड तांदूळ (सीएमआर) योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यातील अंत्योदय व बीपीएल शिधापत्रिकाधारकांना तसेच इतर जिल्ह्यांना तांदूळ पुरवठा केला जातो, परंतु गत ६ महिन्यांपासून येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात विभागाने भाडे तत्वावर घेतलेल्या गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेले अंदाजे ९००० क्विंटल तांदूळ खराब झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांदळाची योग्य साठवणूक व देखरेखी अभावी तसेच गोदामाची स्थिती तांदूळ साठवणे योग्य नसतानाही त्या ठिकाणी साठवणूक करण्यात आली असून पावसाळ्यात गोदामाला गळती लागली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाखांदूर येथील अन्न व नागरी पुरवठा विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सुमारे ९००० क्विंटल तांदळाची नासाडी झाल्याप्रकरणी तातडीने उच्चस्तरीय चौकशी नेमून उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबन व शिस्तभंगाची कारवाई किंवा फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, राज्यातील अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत शिधापत्रिकाधारकांना दर्जेदार अन्नधान्याचा पुरवठा करणे व गोदामांचे सुरक्षित व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर गोदामामध्ये सुमारे ४० क्विंटल तांदुळ काळपट झाला होता. सदर तांदुळ संबंधित राईस मिलर्सकडून बदलून घेण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) केंद्र शासनाच्या विनिर्देशात बसणारा साठा स्वीकृत करण्यात येतो. तसेच गोदामांचे व्यवस्थापन विभागाच्या गोदाम मॅन्युअलनुसार करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध इमारतींमधील अग्निसुरक्षा यंत्रणांची वार्षिक तपासणी नियमितपणे होत नसल्याबाबत

**(१५) * ७३२४ श्री.श्रीकांत भारतीय, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक हॉटेल्स, मॉल व व्यावसायिक इमारतींमध्ये अग्नी सुरक्षा यंत्रणेची वार्षिक तपासणी नियमितपणे करण्यात आलेली नसून काही व्यावसायिक ठिकाणी अग्निशामक यंत्रणा कार्यरत नसतानाही सदर मॉल्स व हॉटेल्सना परवानगी देण्यात आली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक हॉटेल्स, मॉल्स आणि व्यावसायिक इमारतींमध्ये अग्नी सुरक्षा यंत्रणेची वार्षिक तपासणी नियमितपणे होत नसल्याने धोका निर्माण झाला आहे, ज्यामुळे आगीच्या घटना घडल्यास जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान होऊ शकते, तसेच कायदेशीर कारवाईचा सामना करावा लागू शकतो यावर उपाय म्हणून अग्निशमन दलाकडून नियमित तपासणी आणि मालकांनी स्वतःहून नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, जेणेकरून संभाव्य दुर्घटना टाळता येतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट, पब, बार, गृह संकुल व इमारती व अन्य ठिकाणी कार्यक्रम, स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात येते, यावेळी मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येतात या पार्श्वभूमीवर अग्निसुरक्षेबाबत अधिक खबरदारी घेणे आवश्यक असून बृहन्मुंबई महानगरपालिका अग्निशमन दलामार्फत नियमित होणाऱ्या अग्निसुरक्षेव्यतिरिक्त विशेष अग्निसुरक्षा तपासणी मोहीम राबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, सदर तपासणीत आस्थापनांनी अग्निसुरक्षेबाबतच्या अटी व शर्ती यांचे अनुपालन केले नसल्याचे आढळल्यास अग्नि सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनावर कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच सदर नियमांचे पालन करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने मार्गदर्शक तत्वे व सूचना जारी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबईतील हॉटेल्स, रेस्टॉरंट, पब, बार, याठिकाणी होणारे नवीन वर्षाच्या स्वागत सोहळ्याचे कार्यक्रम लक्षात घेता, मुंबई अग्निशमन दलामार्फत २२ डिसेंबर, २०२५ ते २८ डिसेंबर, २०२५ या कालावधी दरम्यान विशेष अग्निसुरक्षा तपासणी मोहीम राबविण्यात आली होती.

या तपासणी मोहीमेमध्ये काही आस्थापना/ इमारतीनी अग्निप्रतिबंधक व अग्निशमन सुरक्षा उपाययोजनांचे अनुपालन केलेले नसल्याचे आढळून आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ३ नुसार अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम ठेवण्याची जबाबदारी इमारतीचे मालक/ भोगवटादार यांची आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये या कायद्यात सुधारणा करुन या कायद्याच्या कलम ४५(अ) नुसार अग्निशमन व जीवसंरक्षक परीनिरीक्षण त्रयस्थ यंत्रणेकडून करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार मालक/ भोगवटादार यांनी प्रथम वर्षी अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षण करणे व त्यानंतर दोन वर्षातून एकदा असे परिनिरीक्षण करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.
(३) व (४) मुंबई अग्निशमन दलामार्फत राबविण्यात आलेल्या विशेष अग्निसुरक्षा तपासणी मोहीमेमध्ये २४४७ आस्थापना/ इमारतीनी अग्निप्रतिबंधक व अग्निशमन सुरक्षा उपाययोजनांचे अनुपालन केलेले असल्याचे आढळून आलेले आहे.

अग्निप्रतिबंधक व अग्निशमन सुरक्षा उपाययोजनांचे अनुपालन न केल्याचे आढळून आलेल्या ७३ आस्थापना / इमारतींना महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ६ नियम ९(१) नुसार फायर ॲक्टची नोटीस बजावण्यात आली असून १८७ आस्थपना / इमारतींवर महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डेब्रिज ऑन कॉल योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याबाबत

**(१६) * ७६३८ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्प, पुलांची बांधणी, रस्ते कॉंक्रीटीकरण, अन्य विकासकामे आणि चाळी झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास, इमारतींची दुरुस्ती आदी कामांमुळे दर दिवसाला

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत सुमारे आठ हजार मेट्रीक टन राडारोडा निर्माण होत असून रस्त्यावर फेकण्यात येणाऱ्या राडारोड्याची विल्हेवाट लावण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला अनेक समस्या उद्‌भवत असून नागरिकांनी रस्त्यावर राडारोडा टाकू नये यासाठी प्रशासनाने 'डेब्रिज ऑन कॉल' योजना सुरू केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकेमध्ये बांधकाम व बांधकामाचा निर्माण होणारा राडारोडा हा नद्या–नाले, मोकळ्या जागा व सार्वजनिक ठिकाणी टाकला जात असून मा.उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश देऊनही अनेक स्थानिक स्वराज्य संस्था सदर नियमावलीची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरत असून बांधकाम कचऱ्याचे विलगीकरण, संकलन, पुनर्वापर व शास्त्रोक्त विल्हेवाटासाठी आवश्यक यंत्रणा, स्वतंत्र केंद्रे व दंडात्मक कारवाईची प्रक्रिया प्रभावीपणे राबवली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत राडारोडा उचलण्यासाठी प्रतिटन ०१ हजार ४७० रुपये इतके शुल्क निश्चित करण्यात आले असून माहे मार्च, २०२४ ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत मुंबईच्या पश्चिम उपनगरातून डेब्रिज ऑन कॉल योजनेला कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, तर शहर व पूर्व उपनगरातून अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डेब्रिज ऑन कॉल योजनेला नागरिकांचा अपेक्षित प्रतिसाद न मिळण्यामागील कारणांची शासन अथवा महानगरपालिकेमार्फत कारणमिमांसा तपासून, नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करुन नियमावलीची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने तसेच सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या कंत्राटदार व इतर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची डेब्रिज ऑन कॉल ही योजना केवळ नागरिकांच्या घरगुती स्वरूपाच्या किरकोळ दुरुस्ती / डागदुजी कामातून निर्माण होणाऱ्या मर्यादित प्रमाणातील राडारोड्याच्या शास्त्रीय विल्हेवाटीसाठी राबविण्यात येत आहे.

सदर योजना मोठ्या प्रमाणावरील बांधकाम, पाडकाम किंवा विकास प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या राडारोड्यासाठी लागू नाही.

(२) हे खरे नाही.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत बांधकाम आणि विध्वंस कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ ची अंमलबजावणी करण्यात येते. बांधकाम परवानगी देताना बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापनाबाबत अटी घालण्यात येतात. संबंधित मालक/ कंत्राटदारांना राडारोडा स्वतःच्या खर्चाने नियमानुसार विल्हेवाट लावण्याच्या सुचना देण्यात येतात.

बांधकाम व पाडकाम कचरा संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने निश्चित केलेल्या ठिकाणी/संकलन/प्रक्रिया केंद्रात साठविण्यात येतो. सदर कचऱ्याचे विलगीकरण करण्यात येते. सदर कचरा सखल भाग (Low Lying Area) आणि रस्ते बांधकामासाठी उपयोगात आणला जातो. सदर कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येते. सद्य:स्थितीत ७ महानगरपालिकांमध्ये बांधकाम व पाडकाम

कचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहेत. स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत एकूण १६ महानगरपालिकांचे बांधकाम व पाडकाम कचरा प्रक्रिया प्रकल्प मंजूर आहेत. त्यापैकी ४ प्रकल्पांस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली असून प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

माहे मार्च, २०२४ ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत पश्चिम उपनगरातून सुमारे १३,५८२ मेट्रिक राडारोडा व शहर व पूर्व उपनगरातून सुमारे १५,७८० मेट्रिक टन राडारोडा डेब्रिज ऑन कॉल योजनेंतर्गत उचलण्यात आला आहे.

(४) डेब्रिज ऑन कॉल या योजनेचा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी व नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या गटदूत/ गटप्रवर्तक/ प्राधिकृत यंत्रणांमार्फत नियमितपणे वसाहती, गृहनिर्माण संस्था, बांधकामस्थळांच्या परिसरात जनजागृती करण्यात येते. तसेच अनधिकृत ठिकाणी राडारोडा टाकण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदार व इतर संबंधितांवर बांधकाम आणि विध्वंस कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ (Construction and Demolition Waste Management Rules, २०१६) तसेच लागू असलेल्या नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील श्री अंबाबाई मंदिराच्या परिसरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(१७) * ६८८९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मंदिराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत मंदिराबाहेरील सर्व विनापरवाना बांधकामे तसेच अतिक्रमणे तातडीने निष्कासित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चारही प्रवेशद्वारांवरील अधिकृत दुकानदारांची यादी करुन त्यांना क्रमांक देणे, दुकानाच्या जागेचे चिन्हांकन करणे तसेच दिशादर्शक फलक लावणे बंधनकारक केले आहे, तर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दक्षिण दरवाजाबाहेरील पार्किंग बंद केले त्याऐवजी भवानी मंडप येथे स्वतंत्र वाहनतळाची सोय करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर अंबाबाई मंदिर परिसरातील अतिक्रमणे हटवून सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर परिसरात मार्गदर्शक नियमावलीची (एसओपी) काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिका, पोलीस प्रशासन आणि मंदिर व्यवस्थापन तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाने समन्वय साधून भाविकांना शिस्तबध्द दर्शन, परिसर सुरक्षित ठेवणे तसेच अतिक्रमण निष्कासित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे आहे. सध्या भवानी मंडप येथे वाहनतळ सुरु करण्याबाबत कोणतीही कार्यवाही सुरु नाही.
(४) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या आदेशानुसार कोल्हापूर महानगरपालिकेकडून श्री महालक्ष्मी मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविण्यात येऊन एकूण १० दुकानधारकांवर दिनांक ३०/१२/२०२५ रोजी कारवाई करण्यात आली. सदर कारवाईवेळी अतिक्रमण पथकासोबत अतिक्रमणधारकांनी वाद घातल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला. त्यानंतर दिनांक ३०/०१/२०२६ व दिनांक ११/०२/२०२६ रोजी अतिक्रमण निर्मूलन पथकामार्फत कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पुनश्च: पोलीस बंदोबदस्तामध्ये अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने बनावट दारुची तस्करी केली जात असल्याबाबत

**(१८) * ७३६६ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोवा बनावटी दारु तस्करी प्रकरणातील बोगस अधिकारी तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर कार्यालयातील १८ कर्मचारी आणि अधिकारी यांच्या संगनमताने बनावट दारुची तस्करी केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गंभीर प्रकरणाच्या चौकशीसाठी या विभागातील सांगलीचे अधीक्षक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाचा सहा महिने इतका कालावधी होऊनही अहवाल प्राप्त झालेला नसल्याचे निदर्शनास आले असून गोवा बनावटीच्या दारू तस्करीतील सहभागी उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर कार्यालयातील १८ कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीचा चौकशी अहवाल प्राप्त होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

एका खाजगी इसमाने शासकीय गणवेश परिधान करुन राज्य उत्पादन शुल्क विभागातील कर्मचारी असल्याचे भासवून गोवा बनावटीचे मद्य तस्करी केल्याने माहे मार्च, २०२५ मध्ये कोल्हापूर जिल्हा भरारी पथकामार्फत गुन्हा रजि.क्र.६५/२०२५, दिनांक २३/०३/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याप्रकरणी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांच्या न्यायालयात क्र. आरसीसी १९३/२०२५ दिनांक २३ डिसेंबर, २०२५ अन्वये दोषारोप दाखल करण्यात आलेले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदरचा प्राथमिक चौकशी अहवाल विभागीय उप आयुक्त, कोल्हापूर यांच्यामार्फत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास प्राप्त झालेला असून सदर अहवालामध्ये उक्त गुन्ह्यामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोल्हापूर कार्यालयातील १८ कर्मचारी/अधिकारी यांचे संगनमत असल्याचे सिध्द झालेले नाही. तथापि, याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या स्तरावरुन सखोल चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियमची दुरवस्था झाल्याबाबत

**(१९) * ६७८८ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरातील श्री.गुरु गोविंदसिंघजी स्टेडियमची दुरवस्था झाली असून स्टेडियमच्या दुरुस्तीसह दक्षिण पेव्हेलियनच्या बांधकाम, खेळाडूंसाठी ड्रेसिंग रुम, जिम्नॅशिअम, द्रव्य तपासणी खोली, वैद्यकीय तज्ञांकरीता खोली, कॉमेंटेटर, स्टोअर रुम बांधण्याच्या प्रस्तावित कामांसाठी कोट्यवधी रकमेचा निधी मंजूर होऊनही गत ७ वर्षापासून संथगतीने कामे सुरु असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्टेडियम मध्ये खेळाडूंसाठी अपुऱ्या सोयी-सुविधा असून जिल्ह्यातील खेळाडूंची गैरसोय होत आहे तरी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करुन सुसज्ज असे स्टेडीयम खेळाडूंसाठी त्वरीत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करुन सदर काम करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.गुरु गोबिंदसिंघजी स्टेडियमचे आधुनिकीकरण व नुतनीकरणाबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सादर केलेल्या रुपये ४२.०० कोटीचा प्रकल्प अहवालास केंद्र शासनाच्या सांस्कृतिक व पर्यटन मंत्रालयाने दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये मान्यता प्रदान केली.

सद्य:स्थितीत सदर कामासाठी एकूण मंजूर निधी रुपये ४२.०० कोटी पैकी रुपये ३१.५० कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. आतापर्यंत सदर कामावर रुपये ३२.३४ कोटी खर्च झाला असून सदर कामाचे विनियोग प्रमाणपत्र महानगरपालिकेने केंद्र शासनास सादर केले आहे. सदरचे काम अंतिम टप्प्यात असून दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(२) सदर कामामध्ये वेगवेगळया कारणांमुळे विलंब झाला असून ठेकेदाराशी संबंधित विलंबाबाबत महानगरपालिकेकडून ठेकेदारास वेळोवेळी नोटीस बजावण्यात आल्या असून महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सदर प्रकल्पास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेमधील अटी व शर्तीनुसार सदर कामासाठी टर्न-की पध्दतीने चार वेळेस निविदा मागविण्यात आली. तथापि, निविदेस अपेक्षित प्रतिसाद न लाभल्याने महानगरपालिकेने केलेल्या विनंतीनुसार केंद्र शासनाने दिनांक २२/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये बी-२ पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता प्रदान केली. निविदा पध्दतीमधील बदलामुळे नव्याने सल्लागाराची नियुक्ती करून निविदा प्रक्रीयेअंती कंत्राटदारास दिनांक ११/०९/२०१९ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले.

निविदा पध्दतीमधील बदल, सल्लागारामध्ये बदल, सुधारित आराखडे करण्याची आवश्यकता, कोविड-१९ च्या आपत्तीमुळे झालेला उशीर, दक्षिण बाजूच्या पॅव्हेलियनच्या बांधकामातून साधारणतः ५०० मी लांबीची मुख्य जलवाहिनी स्थलांतरीत करणे, मोठ्या प्रमाणात झालेला पाऊस इत्यादी विविध कारणांमुळे सदर कामास विलंब झाला आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबई व नागपूर शहरातील नागरिकांवर भटक्या श्वानांच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(२०) * ६९५५ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.योगेश टिळेकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.अमित गोरखे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८४ ला दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे यांसारख्या प्रमुख शहरांसह राज्यात गत सहा वर्षांमध्ये ३० लाखांहून अधिक डॉग-बाईट प्रकरणे नोंदली गेली असून सन २०२४ मध्ये एकट्या मुंबईत १.२८ लाख कुत्रे चावल्याच्या घटना घडल्या असून, दररोज सरासरी १,३६९ लोकांना कुत्रे चावत असल्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात आली असून ठाणे जिल्ह्यातील दिवा येथील कुमारी निशा शिंदे या सहा वर्षीय मुलीचा भटक्या कुत्र्याने चावा घेतल्यामुळे कस्तुरबा गांधी रुग्णालयात रेबीजने मृत्यू झाल्याची घटना दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०२५ मध्ये कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या २७ हजार ४६६ घटना घडल्या असून मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने महानगरपालिकेला शहरातील शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संकुले, बस व रेल्वे स्थानके येथील भटक्या कुत्र्यांसाठी निवारे तयार करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार शहरात तीन ठिकाणी जागा शोधल्या असून, आणखी १७ जागांचा शोध सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील सुमारे २ लाख लोकसंख्या असलेला उरण परिसरात गेल्या २० महिन्यांच्या कालावधीत कुत्रा चावल्याने ६,४४३ रुग्ण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले असून महिन्याकाठी कुत्रे चावलेल्या सरासरी ३०० ते ३२५ रुग्णांवर उपचार करण्यात येत असून सुमारे २५० बाह्यरुग्ण दैनंदिन उपचारासाठी येतात तसेच आंतररुग्णांची संख्याही १७५ पर्यंत असून

सोनोग्राफी, दंत चिकित्साद, प्रयोगशाळा तपासणी, क्ष-किरण, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, वैद्यकीय गर्भपात आदी रुग्णांची संख्याही मोठ्या प्रमाणात असल्याने रुग्णालयावर भार वाढत असल्याची माहिती संबंधित रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी दिली असून शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयावर वाढत असलेला भार याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्बीजिकरण (Animal Birth Control), रेबीज प्रतिबंधक लसीकरण व स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी स्पष्ट करणारे दिलेल्या निर्देशनानुसार भटकी कुत्री नियंत्रण नसबंदी व पुनर्वसन कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे बंधनकारक असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून त्यांची योग्य अंमलबजावणी झालेली नसून मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या सुमारे ४०००० पेक्षा अधिक असून दरवर्षी हजारो नागरिकांना कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांना सामोरे जावे लागत आहे तसेच नसबंदी केंद्राची अपुरी क्षमता मनुष्यबळांचा अभाव व नियोजन च्या कमतरतेमुळे ही समस्या अधिक गंभीर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पनवेल शहरात दोन वर्षात कुत्रा चावल्याने जखमी होण्याच्या एकूण किती घटना घडल्या आहेत, घटनांमध्ये किती रुग्णांवर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत असूनही त्यांचा बंदोबस्त करण्याकरता आवश्यक ते साधन महानगरपालिकेकडे नसून मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यस्तरीय निरीक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थांवर जबाबदारी निश्चिती व कामगिरीचे मूल्यांकन न केल्यामुळे माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत निर्बिजिकरण व लसीकरणाची उद्दिष्टे साध्य झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी न होण्यामागील कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी न्यायालयीन आदेशांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांवर जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती ठोस कार्यवाही व उपायोजना करण्यात येत आहे,

(७) असल्यास, शहरात पुरेशा जागाच उपलब्ध नसल्याने महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाला अडचणींचा सामना करावा लागत असून (Animal Birth Control) नियमांनुसार भटक्या कुत्र्यांचे नपुंसकीकरण व लसीकरण करुन सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देऊन भटक्या कुत्र्यापासून नागरिकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयामध्ये सन २०२४-२०२५ मध्ये एकूण २४४२ श्वान दंश रुग्ण तसेच सन २०२५-२०२६ मध्ये जानेवारी, २०२६ अखेर २७९२ श्वान दंश रुग्ण उपचारार्थ आले आहेत. श्वानदंशाचे दरमहा सरासरी २०० रुग्ण उपचारासाठी येत असतात.

उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयामध्ये उरण तालुक्यातील विविध भागातून रुग्ण उपचारासाठी येत असून येथील दैनंदिन बाह्यरुग्ण संख्या सरासरी २५० ते ३०० इतकी आहे.

याशिवाय सोनोग्राफी, दंत चिकित्सा, प्रयोगशाळा तपासणी, क्ष-किरण, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, वैद्यकीय गर्भपात व इतर उपचारार्थ आलेल्या रुग्णांना चांगल्या व गुणात्मक रुग्णसेवा पुरविल्या जात आहेत.

(४) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०१४ व सन २०२४ मध्ये भटक्या श्वानांचे सर्वेक्षण केले असून सन २०१४ मध्ये ९५,१७२ व सन २०२४ मध्ये ९०,७५७ इतके भटके श्वान नोंदविण्यात आले आहेत. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ८ निर्बीजीकरण केंद्रे सुरु असून सदर केंद्रांमध्ये सन २०२५ पर्यंत ४,४६,२०३ भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे.

(५) हे खरे नाही.

पनवेल शहरात दोन वर्षात कुत्रा चावल्याच्या एकूण १२,४०० इतक्या घटनांची नोंद झाली असून त्यांना पनवेल महानगरपालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत लसीकरण व उपचार करण्यात आले आहेत. त्यापैकी ११०५ जखमी (Category ३) रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे पुढील उपचार आणि इम्युनोग्लोब्युलीन्स देण्याकरीता पाठविण्यात आले आहे.

भटक्या श्वानांचे नियंत्रण करणेकरीता प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रम सन २०१८ पासून प्राणी जन्म नियंत्रण केंद्र पोदी, नवीन पनवेल येथे असून या केंद्रामार्फत भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व उपचार करण्यात येतात. सदर प्राणी जन्म नियंत्रण केंद्रांची क्षमता वाढविण्यासाठी अतिरिक्त पिंजरे (Kennels) उभारण्याचे काम सुरु आहे.

तसेच, एप्रिल, २०२५ पासून दोन पशुवैद्यकीय फिरते दवाखाने कार्यरत आहेत.

(६) मा.सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने नगरविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना तसेच ग्रामविकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, केंद्र शासनाच्या प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरीता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नगरविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २० मार्च, २०२५ अन्वये तर राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्रामविकास व पंचायत राज विभाग, शासन परिपत्रक दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात विविध स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

(७) प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रम राबविण्यासाठी शहरात उपलब्ध जागेबाबत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही चालू आहे.

याकरीता भटक्या श्वानांच्या संख्येच्या गुणोत्तरामध्ये अस्तित्वात असणाऱ्या निवारा केंद्रांची क्षमता वाढविणे, निर्बिजीकरणासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा निश्चित करुन त्यामध्ये जलद गतीने वाढ करणे तसेच कृती आराखडा तयार करणे इत्यादी निर्देश अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे अध्यक्षतेखाली वेळोवेळी झालेल्या बैठकीत सर्व महानगरपालिकांना देण्यात आले आहेत.

-----------------

## पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२१) * ६९९६ श्री.योगेश टिळेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सोलापूर महामार्गावर विशेषत: इंदापुरात वर्षभरात १०९ अपघातांत ३९ प्रवाशांनी जीव गमावला असून सदर महामार्गावरील अपघात कमी करण्याच्या दृष्टिकोनातून परिणामकारक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी प्रवाशांसह वाहनचालक करित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी रस्त्यांची दुरुस्ती (अरुंद पूल, तीव्र उतार), वाहतूक नियमांची अंमलबजावणी, अनधिकृत पार्किंग व अतिक्रमणे काढणे, पथदिव्यांची व्यवस्था सुधारणे आणि वाहनचालकांना शिस्त लावणे यांसारख्या उपाययोजना करुन भिगवण-इंदापूर यांसारख्या अपघातप्रवण महामार्गावरील अपघात कमी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, पुणे-सोलापूर महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण होऊन एक तपाचा कालावधी होऊनही महामार्गावर अपघात होऊन मृत्यूच्या घटना घडत असून, अपघातांचे प्रमाण चिंताजनक असल्याचे दिसून येत असून वाहनांची वाढलेली संख्या आणि रस्त्याची रुंदी यांचा विचार करता अधिक प्रभावी सुरक्षा उपाययोजना करण्याची आवश्यकता असून त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे,

पुणे-सोलापूर हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. पोलीस विभागाच्या अहवालानुसार या राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर पोलीस स्टेशन हद्दीत सन २०२५ मध्ये वर्षभरात ९५ अपघातांची नोंद असून त्यामध्ये २५ व्यक्ती मयत झाल्याची नोंद आहे.

सदर अपघात हे वाहनांच्या अतिवेगामुळे व वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) अपघातांची संख्या विचारात घेऊन, प्राधिकरणाने पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघात प्रवण क्षेत्रात अपघात कमी करण्यासाठी अल्पकालीन तसेच दीर्घकालीन उपाययोजना केल्या आहेत.

अ) दीर्घकालीन उपाययोजना : १. पुणे-सोलापूर महामार्गावर इंदापूर व वरकुटे येथे अंडरपास पूर्ण करण्यात आलेले आहेत. तसेच वरवंड, खडकी, पाटस, भांडगाव येथे अंडरपासचे काम सुरु आहे.

२. पुणे सोलापूर महामार्गावर स्वामी चिंचोली व डाळज येथे अंडरपासच्या कामासाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.

ब) अल्पकालीन उपाययोजना : १. पुणे-सोलापूर प्रकल्पाच्या विविध ठिकाणी अपघातप्रवण क्षेत्रांमध्ये सुमारे ८ किमी लांबीचे Crash Barrier लावण्यात आलेली आहेत.

२. यवत आणि भिगवण येथे पथदिवे लावण्यात आलेली आहेत.

वाहतूक सुरक्षेच्या उपाययोजना : खड्डे बुजवणे, दिशादर्शक फलक, बॅरिकेड्स, ब्लिंकर्स व रिफ्लेक्टर्स, वेगमर्यादा फलक इ. उपाययोजना सदर ठिकाणी करण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे महामार्गावर वेग मर्यादा दर्शविणारे, मार्गदर्शक, अपघात प्रवण क्षेत्र, नो-पार्किंग, सुचना फलक आवश्यक ठिकाणी लावण्यात आले आहेत.

तसेच वाहनचालकांमध्ये वाहतुकीचे नियम, यापुर्वी झालेले अपघात व त्याची कारणे यांसंबधाने जनजागृती करणेकरीता नियमीतपणे जनजागृती/प्रबोधन स्वरूप कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे.

महामार्गावर अपघात होवू नयेत यासाठी ठराविक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत. तसेच अपघात कमी करण्याच्या दृष्टीने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यानूसार कारवाई करणेकरीता महामार्गावर नियमीतपणे पोलीस विभागाद्वारे अधिकारी, अंमलदार यांची पेट्रोलींग ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील गाड्या नादुरुस्त असल्याबाबत

**(२२) * ६८४० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये अग्निशमन विभागात पाच ते सहा अग्निशमन गाड्या असून त्यापैकी बहुतेक गाड्या या कार्यशाळेत दुरुस्तीसाठी उभ्या असून फक्त एकच गाडी कार्यरत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोल्यात मोठी औद्योगिक वसाहत व मोठी शहरी लोकवस्ती, दुकाने, हॉटेल्स असल्याने एखादी दुर्घटना घडून आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अग्निशमन यंत्रणेची व्यवस्था अपुरी पडण्याची भिती नागरिकांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आग विझविण्यासाठी नादुरुस्त असलेल्या गाड्या तातडीने दुरुस्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

अग्निशमन विभागामध्ये एकूण सात वाहने असून यापैकी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये एका वाहनाच्या पाण्याची टाकी लिकेज असल्यामुळे वाहन नादुरुस्त झाले होते. या वाहनाची तात्काळ दुरुस्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत अकोला महानगरपालिका अग्निशमन विभागातील सर्व वाहने कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, वाढती लोकसंख्या लक्षात घेता नविन अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरीता महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) अग्निशमन वाहन नादुरुस्त झाल्यास तात्काळ वाहन दुरुस्त करून घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपळस ते येवला (ता.निफाड, जि.नाशिक) या महामार्गाची उंची वाढविण्याबाबत

**(२३) * ६५८६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळस ते येवला (ता.निफाड, जि.नाशिक) या ५६० कोटी रुपये खर्चाच्या महामार्गाचे कॉंक्रीटीकरण करताना रस्ता आजूबाजूच्या शेतजमिनीपेक्षा एक ते दीड फूट खोल करण्यात येत असून रस्ते अभियांत्रिकीच्या नियमानुसार महामार्गाची उंची आजूबाजूच्या क्षेत्रापेक्षा जास्त असणे आवश्यक असतानाही, जुन्याच पातळीवर किंवा त्यापेक्षाही खाली कॉंक्रीटीकरण केले असल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाच्या चुकीच्या नियोजनामुळे पावसाळ्यात या महामार्गावर दोन ते तीन फूट पाणी साचून तो एखाद्या कालव्यासारखा झाला असून, केवळ कंत्राटदाराचे बिल काढण्यासाठी तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे रुपये ५६० कोटी एवढ्या रकमेच्या शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निफाड आणि येवला तालुक्यांतील कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या सदर महामार्गाची उंची न वाढवल्यामुळे भविष्यात महामार्ग वारंवार बंद पडण्याची शक्यता असून वाहनधारकांसह रुग्णवाहिकांनाही सदर समस्येचा सामना करावा लागून नागरिकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महामार्गाची उंची वाढवून प्रकल्प शास्त्रशुध्द पध्दतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच अभियांत्रिकी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यावर सा.क्र.कि.मी १७९/००० ते २२८/९१० या लांबीत कॉंक्रीटिकरण करण्याचे काम सुरू आहे. सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्त्याच्या बाजुला सा.बां. विभागाच्या हद्दीबाहेर स्थानिक शेतकऱ्यांनी नैसर्गिक नाले प्रवाहावर अतिक्रमण करुन बुजवल्याने रस्त्यावर फुगवटा (Water Logging) तयार होऊन पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाला होता. तसेच, सदर प्रकल्पात आजुबाजुच्या शेतीजमिनींचा अभ्यास करुन व अस्तित्वातील सर्व मोठी व लहान पुले सुस्थितीत असल्याने रस्त्याची उंची पुलांच्या समपातळीत ठेवण्यात आल्याने Plan & Profile तयार करुन रस्ता पातळी निश्चित करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

मंजूर अंदाजपत्रकातील वावानुसार अस्तित्वातील जुने मोठे व लहान पुले सुस्थितीत असल्याने रस्त्याची उंची वाढविण्यात आलेली नाही. त्यामुळे काही लांबीत नवीन काँक्रीट रस्त्याची उंची पुलांच्या समपातळीत ठेवण्यात आलेली आहे व उर्वरित लांबीत अस्तित्वातील रस्त्याची पातळी पेक्षा एक ते तीन फुटापर्यंत उंची वाढविण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

रस्त्यावरील काँक्रिटीकरणाचे तसेच दोन्ही बाजूचे पुल मोऱ्यांसह दोन्ही बाजूच्या खुल्या गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतर भविष्यात महामार्ग सदर बंद पडण्याची शक्यता नाही.

(४) सदर प्रकल्प शास्त्रशुध्द पध्दतीने पूर्ण करण्यासाठी तांत्रिक अनुभवी प्राधिकरण अभियंत्यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे व त्यांच्या देखरेखी खाली काम गुणवत्तेने प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलींना कुटुंब निवृत्तीवेतन मंजुरीसाठीच्या जाचक अटी वगळण्याबाबत

**(२४) * ७७४३ श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलीला कुटुंब निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत वित्त विभागाने दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले असून सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ९ नुसार, निवृत्तीवेतनधारक हयात असतानाच मुलीने त्यांच्यावर अवलंबून असल्याचे ‘साक्षांकित मूळ स्व-घोषणापत्र’ देणे अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूनंतर कुटुंब निवृत्तीवेतनाची मागणी करणाऱ्या पात्र मुलींना, पालक हयात नसल्यामुळे असे स्व-घोषणापत्र सादर करणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य होत असल्याने जिल्हा परिषद, रत्नागिरी व अन्य जिल्हाधिकारी कार्यालयांकडून शासनाकडे मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आली आहे, त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, पालकांच्या मृत्यूनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या बाबतीत ही ‘हयात असतानाची’ अट शिथिल करून, पात्र वारसांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन या नियमात सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या तांत्रिक अडचणीमुळे निवृत्तीवेतनापासून वंचित राहणाऱ्या महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) याबाबत जिल्हा परिषद रत्नागिरी यांना मार्गदर्शन करण्यात आले असून, त्यानुसार सदर स्व-घोषणापत्र पालकाने सादर करावयाचे नसून मुलीने सादर करावयाचे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई व ठाणे परिसरातील भूखंड विकासकामार्फत अवैध मार्गाचा अवलंब करुन मिळविले जात असल्याबाबत

**(२५) * ७४९३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. हिरानंदानी या विकासकामार्फत मुंबई तसेच ठाणे परिसरात मोठ्या प्रमाणात निवासी तसेच व्यावसायिक वापराकरीता नवनवीन इमारतीचे बांधकाम मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतींच्या बांधकामाकरीता आवश्यक असणारे भूखंड मे.हिरानंदानी या विकासकामार्फत अवैध मार्गाचा अवलंब करुन मिळविले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे येथील रहिवासी श्री.बाळकृष्ण पोरणेकर यांच्या मालकीची जमीन विविध मार्गाने दबाव आणून स्वत:च्या फायद्याकरीता बळकाविण्यात येत असून याकरीता ठाणे शहराचे पोलीस आयुक्त, तसेच ठाणे महानगरपालिकेचे काही वरिष्ठ अधिकारी व इतर शासकीय यंत्रणा हाताशी धरुन त्यांच्याकडून श्री.पोरणेकर यांचेवर दबाव आणण्याचा मे.हिरानंदानी विकासकामार्फत प्रयत्न होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विकासकाकडून यापूर्वीही अनेक शासकीय व खाजगी भूखंड कवडीमोल भावात विकत घेऊन त्याठिकाणी नियमबाहयरित्या गृहनिर्माण प्रकल्प उभे करुन त्या प्रकल्पातील सदनिका कोट्यवधी रकमेला विक्री करुन जमीन मालक व शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी दोषी विकासक व इतर संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमधील ठोक मानधन तत्वावर कार्यरत शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत

**(२६) * ६८६५ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेतील १४ वर्षांपासून ठोक मानधन तत्वावर ३० माध्यमिक शिक्षक व ३१ शिक्षण सेवक कार्यरत असून सदर शिक्षकांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाच्या नगरविकास विभागाच्या विचाराधीन असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ३० पैकी २३ शिक्षकांची नियुक्ती माहे मे, २०११ रोजीच्या जाहिरातीद्वारे आरक्षण, मुलाखत, गुणवत्ता यादी, कागदपत्र तपासणी या द्वारे सदर झाली असून शिक्षकांना कायम करण्यासाठी महानगरपालिकेने ठराव मंजूर करून शासनास सादरही केलेला असून महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये मोठ्या संख्येने मंजूर व रिक्त जागा आहेत महानगरपालिका शिक्षकांच्या वेतनावरील १००% भार घेण्यास तयार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी ठोक मानधन तत्वावरील ५० शिक्षकांना कायम केल्याची बाब निदर्शनास आली असून त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेतील ३१ शिक्षण सेवक व ३० ठोक मानधनावरील शिक्षकांना सेवेत कायम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील ठोक मानधन तत्वावरील ५० शिक्षकांच्या नेमणूका ह्या (जाहिरात/लेखी परीक्षा/मुलाखत) या विहीत मार्गाचा अवलंब करून झालेल्या असल्याने, त्यांना नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कायम करण्यात आले आहे.

तसेच, नवी मुंबई महानगरपालिकेतील ३१ शिक्षण सेवक व ३० ठोक मानधनावरील शिक्षकांना सेवेत कायम करण्याचा प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यास नागरिकांचा विरोध असल्याबाबत

**(२७)** * **६९९७ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यानुसार शहरातील प्राचीन मंदिरे बाधित होत असून, उक्त प्राचीन मंदिरे पाडली जात असल्यामुळे हिंदू बांधवाच्या भावना दुखावल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन विकास आराखड्यास नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला असून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, सदरहू नवीन विकास आराखड्याबाबत फेरविचार करण्याची नितांत आवश्यकता असून यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी देखील शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहरासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन विकास आराखड्यात (डीपी) शहरातील सर्व प्राचीन आणि वैभवशाली मंदिरे आणि श्रध्दा स्थाने नष्ट होत असून शासनाने तातडीने निर्णय घेऊन नवीन विकास आराखड्यातून बाधित प्राचीन मंदिरे वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्राचीन मंदिरे इत्यादी जुन्या विकास योजनेत सुध्दा अस्तित्वात होते आणि भागश: मंजूर करण्यात आलेल्या नवीन विकास आराखड्यात देखील सदर वास्तु दर्शविण्यात आल्या आहेत. त्यामुळे नव्याने तयार करण्यात आलेल्या विकास योजनेमध्ये प्राचीन मंदिरे पाडली जात आहेत ही बाब खरी नाही.

(२) शासन अधिसुचना दिनांक ३१/०८/२०२३ व दिनांक ०७/११/२०२३ अन्वये नुसार प्रारुप विकास योजना छत्रपती संभाजीनगर, [मूळ हद्द (दुसरी सुधारित) + वाढीव हद्द (पहिली सुधारित) + सातारा, देवळाई + सिडको/ सिडको निर्धीसुचित क्षेत्र + चिखलठाणा MIDC] तयार करणे कामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम २१(४अे) व १६२(१) नुसार शासनास प्रदत्त अधिकारानुसार, उक्त अधिनियमाचे कलम-२६ ते ३० पर्यंतची कार्यवाही करणेकामी उपसंचालक नगर रचना, बृन्हमुंबई तथा नियुक्त अधिकारी, विकास योजना विशेष घटक, छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका यांची "अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

त्यानुसार नियुक्त अधिकारी यांनी सादर केलेली विकास योजना, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) नुसार नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक ०७/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली व प्राप्त सुचना हरकतींवर नियुक्त अधिकारी यांनी सुनावण्या घेऊन, सदर विकास योजनेमध्ये आवश्यक बदल सुचवून दिनांक ०८/०८/२०२४ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम-३० चे तरतुदीन्वये शासन मंजूरीस्तव सादर केली. त्यानुसार शासन मान्यतेने दिनांक १५/०४/२०२५ रोजीच्या अधिसुचनेन्वये सादर विकास योजना भागश: मंजूर करण्यात आली.

तसेच सदर विकास योजनेमधून वगळलेल्या सारभूत फेरबदलांबाबतची सुचना दिनांक १५/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

सदर विकास योजनेमधून वगळलेल्या सारभूत फेरबदलांबाबत प्राप्त हरकती/ सूचनांबाबत सुनावणी देण्यासाठी व त्याबाबतचा अहवाल शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेसाठी सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार आवश्यक कार्यवाही पार पाडून सदर विकास योजनेमधून वगळलेले सारभूत फेरबदलांबाबतचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे.

सदर विकास योजनेबाबत, आक्षेपधारक, लोकप्रतिनिधी आणि नागरीकांना उक्त अधिनियमाच्या कलम २६(४) व ३१(१) अन्वये आक्षेपानुसार सुनावण्या देण्यात आल्या असून, सुनावणीच्या अनुषंगाने शासन नियुक्त समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. त्यामुळे सदरहू नवीन विकास योजनेबाबत फेरविचार करण्याची आवश्यकता नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिकेंतर्गत सिडकोच्या निवासी भूखंडावर बस डेपो बांधण्याबाबत

**(२८)** * **७७४६ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांदेश्वर (ता.पनवेल, जि.रायगड) येथे सिडकोच्या संचालक मंडळाकडून निवासी भुखंडाचे वाटपपत्र दिनांक १५ मे, २०२४ रोजी माजी शासकीय अधिकारी संस्थेस देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवासी भूखंड वाटपामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या असून महाराष्ट्र भूसंपादन अधिनियमाचे काटेकोर पालन केले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंड वाटप करताना सिडकोच्या पूर्वी आरक्षित असलेल्या बस डेपो असलेला भूखंड सहकारी संस्थेस वाटप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवी मुंबईची लोकसंख्या वाढत असून पुढील काळात रस्ते वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात ताण पडणार असून अशा परिस्थितीत परराज्यातून येणाऱ्या परिवहन सेवेच्या बसेसचे आतापासून सुयोग्य नियोजन करण्यासाठी सिडकोमार्फत आंतरराज्यीय बस टर्मीनलचा प्रकल्प हाती घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर भूखंड पनवेल महानगरपालिकेच्या ताब्यात देऊन त्यावर कामोठे आणि खांदेश्वर यातील रहिवाशांसाठी बस स्थानक बनविण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित कळंबोली येथील जमिनीच्या बदल्यात देय भूखंडाचे सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२८५१ दिनांक १२/०२/२०२४ अन्वये भूखंड क्र. ३६ ते ४१, सेक्टर-२५, कामोठे नोड येथील वाटपपत्र दिनांक १५/०५/२०२४ रोजी जारी करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) सेक्टर-२५, कामोठे येथे नियोजित ‘आंतर-राज्य बस स्थानक’ (ISBT) हा भूखंड पोहोच सुलभता (Accessibility) व वाहतूक व्यवस्थापन (Traffic Dispersal) तसेच पनवेलचे भौगोलिक स्थान विचारात घेऊन सेक्टर-३, पनवेल येथे सन २०१४-१५ मध्येच स्थलांतरित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत सेक्टर-३, पनवेल येथील बस स्थानकाचा भूखंड ‘आंतर-राज्य बस स्थानक’ (ISBT) साठी आरेखित आहे. संबंधित भूखंड मागणीनुसार नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारित) नियमावली, २००८ मधील तरतुदीनुसार सिडको संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर भूखंड हस्तांतरित करण्याचे प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांचे सुरक्षा लेखापरीक्षण करण्याबाबत

**(२९)** * **७८०७ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीत झालेल्या रस्ते अपघातात ११०० नागरिकांचा मृत्यू झाला असून, नाशिक शहरातील वर्दळीचा द्वारका सिग्नल, मुंबईनाका सर्कल, गडकरी चौक, नांदूरनाका, सिध्दिविनायक चौक, मिर्ची चौक, नाशिकरोड येथील दत्त मंदिर सिग्नल, उपनगर सिग्नल, फेम मल्टिपेल्स सिग्नल यांसह प्रादेशिक परिवहन विभागाने शहरात २६ धोकादायक ‘ब्लॅक स्पॉट’ शोधल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरातील ७ ‘ब्लॅक स्पॉट’ कडे महानगरपालिका व पोलीस वाहतूक विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये झालेल्या विविध रस्ते अपघातात २१ नागरिकांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आली असून शहरातील द्वारका, मुंबई नाका, सातपूर एमआयडीसी यांसारख्या वर्दळीच्या ठिकाणी सिग्नल यंत्रणा बंद असणे आणि रस्ते विकासासाठी उपलब्ध निधीचा विनियोग सुरक्षिततेच्या उपाययोजनांसाठी न केल्यामुळे अपघातांची तीव्रता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर नाशिक महानगरपालिकेने अद्याप आपल्या कार्यक्षेत्रातील १७६० किमी रस्त्यांचे सुरक्षा लेखापरीक्षण केले नसून माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये मिरची हॉटेल चौकातील भीषण अपघातानंतर, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या प्रतिबंधात्मक निर्देशांची अद्याप पूर्णतः अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्यांवरील अतिक्रमणे, अनधिकृत पार्किंग आणि रिफ्लेक्टर्सचा अभाव यांमुळे पादचारी व वाहनधारकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून, शासकीय यंत्रणेच्या नियोजनाअभावी मनुष्यबळाची मोठी हानी होत असून रस्ते प्राधिकरण समितीने सुचविलेल्या अभियांत्रिकी सुधारणा व रस्ते सुरक्षा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास संबंधित विभागांकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०२७ च्या कुंभमेळ्यातील भाविकांची सुरक्षा लक्षात घेता, शासन निर्णय २६ ऑक्टोबर, २०१८ नुसार गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत अपघाताची तीव्रता कमी करण्यासाठी शासन करीत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, नाशिक महानगरपालिकेमार्फत २६ ब्लॅक स्पॉटचा बारकाईने अभ्यास करुन अपघात कारणाची सखोल मिमांसा करुन रस्त्यांवरील खड्डयांचे सर्व्हेक्षण करुन त्याचे वर्गीकरण व प्राथम्यक्रम निश्चित करुन तात्काळ दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच रस्ते दुरुस्ती कामात दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१७-२१ या कालावधीत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील विविध विभागांच्या अखत्यारीतील ‘ब्लॅक स्पॉट’ (Black Spot Series १, २ व ३) असून यामध्ये नाशिक महानगरपालिकेच्या अखत्यारीतील १२, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (NHAI) ०८, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे (NH-PWD) ०३ आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे (PWD) ०३ अशा एकूण २६ ब्लॅक स्पॉटचा समावेश आहे

(२) द्वारका व मुंबई नाका येथील सिग्नल यंत्रणा सद्य:स्थितीत पोलीस विभागाच्या नियंत्रणाखाली असून पोलीस विभागाच्या मागणीनुसार एम.आय.डी.सी. परिसरातील एक्स्लो पॉईंट येथे नवीन सिग्नल यंत्रणा बसविण्याचे काम सुरु आहे.

नाशिक महानगरपालिकेद्वारे रस्ते बांधकामाच्या निविदेमध्ये थर्माप्लास्टिक पेंट, कॅट आईज, रंबलर्स, सूचना फलक, प्रतिबंधात्मक फलक, रिफ्लेक्टर, डेलिनिएटर इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येत असून, त्याप्रमाणे संबंधित कामे पूर्ण केली जात आहेत.

याव्यतिरिक्त, शहरातील पादचारी सुरक्षा व रस्ते सुरक्षितता उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकामी नाशिक महानगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात आवश्यक निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) नाशिक महानगरपालिकेद्वारे शहरातील प्रमुख चौकांचे सुलभीकरण (Junction Development), रस्त्यांचे रेखांकन (Street Design) आणि रस्ते सुरक्षा लेखापरीक्षण (Road Safety Audit) यांसारख्या कामांसाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

माहे ऑक्टोबर, २०२२ मधील दुर्देवी हॉटेल मिरची येथील भिषण अपघातानंतर सदरील ठिकाणी सार्वजनिक बांधकाम व रस्ते विभागाकडून अर्थसंकल्पातुन उड्डाणपुलाचे काम मंजूर असून सदर काम सुरु आहे.

(४) रस्त्यावरील अतिक्रमणांबाबत नाशिक महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत सहाही विभागनिहाय स्तरावर नियमितपणे दैनंदिन मोहिमा राबवून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते. तसेच, अनधिकृत पार्किंगवर दंडात्मक कार्यवाही करण्याची जबाबदारी शहर वाहतूक शाखेमार्फत पार पाडली जाते. नाशिक शहरासाठी Non-Motorised Transport Policy (NMT Policy - पादचारी व सायकलिंग) तयार करण्याचे काम सुरु असून, रस्त्यावरील पार्किंग सुव्यवस्थित करण्यासाठी ‘ऑन-स्ट्रीट पार्किंग’ (पार्किंग + टोईंग) बाबतची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शहरात ‘सुरक्षित शाळा क्षेत्र’ उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

(५) सन २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने भाविकांची सुरक्षा लक्षात घेता स्वतंत्र वाहतूक आराखडा व पार्किंग व्यवस्था नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक यांचेमार्फत तयार करण्याचे काम सुरु आहे.

(६) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या अखत्यारीत असलेल्या १२ ‘ब्लॅक स्पॉट’ (Black Spots) ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुरक्षात्मक उपाययोजना पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने जिल्हा रस्ता सुरक्षा समितीमार्फत नियमितपणे आढावा घेण्यात येतो असून, समितीने सुचविलेल्या रस्ता सुरक्षा विषयक मार्गदर्शक सूचनांची वेळोवेळी प्रभावी अंमलबजावणी केली जाते. तसेच, शहरातील रस्त्यांची गुणवत्ता राखण्यासाठी आवश्यकतेनुसार रस्ते दुरुस्तीची कामे सातत्याने हाती घेण्यात येतात.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: विदर्भात तसेच मसुर व उंब्रज (जि.सातारा) परिसरात दुधामध्ये भेसळ होत असल्याबाबत

**(३०) * ७९५७ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मसुर व उंब्रज (जि.सातारा) परिसरात दुधामध्ये भेसळ होत असून दुधामध्ये पाणी, रासायनिक पदार्थ, डिटर्जंट युरिया, स्टार्च, कृत्रिम फॅट आदिंची भेसळ करुन बाजारात विक्री होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भात देखील केमिकलमिश्रित दुधाचा काळाबाजार होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून भेसळयुक्त दुधामुळे यकृत, मूत्रपिंड (kidney failure), हृदयविकार आणि कर्करोगासारखे गंभीर आजार उद्‌भवत असून अधिक नफा मिळवण्यासाठी ही भेसळ केली जाते, परंतु अन्न सुरक्षा अधिकारी आणि स्थानिक प्रशासन कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विविध भागात होणाऱ्या दुध भेसळीचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम पहाता सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन आढळून आलेल्या संबंधित दोषींवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी तसेच दुध उत्पादक, खासगी दूध संघ, दुध डेअरी यांनी उच्च प्रतीचे दूध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री करावी याकरीता शासनाने कठोर उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) राज्यात ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत दुध या अन्न पदार्थाचे एकूण ११६२ नमुने विश्लेषणास घेण्यात आले होते. त्यापैकी ६७६ नमुने प्रमाणित दर्जाचे घोषित करण्यात आले असून ५९ नमुने कमी दर्जा व १ नमुना मिथ्याछाप घोषित करण्यात आले आहेत. तसेच २ नमुने हे असुरक्षित घोषित करण्यात आले आहेत. ४२४ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. कमी दर्जा व मिथ्याछाप घोषित करण्यात आलेल्या पैकी १७ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज तसेच ३ प्रकरणी तडजोड अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित प्रकरणी अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: नागपुर जिल्ह्यात अवैधरित्या टेरेस बार सुरू असल्याबाबत

**(३१)** * **७३३१ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: नागपुर जिल्ह्यात अवैधरित्या टेरेस बार सुरू असून अनेक टेरेस बारला राज्य उत्पादन शुल्क विभागाने परवानगी दिली नसतानाही ते चालविण्यात येत असल्याने स्थानिक रहिवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपुर जिल्ह्यात एकाही टेरेस बारला उत्पादन शुल्क विभागाकडून परवानगी देण्यात आली नसून रेस्टॉरंटचा परवाना असेल त्यांनाच आणि परमिट रूममध्येच परवानगी दिली जाते, परंतु टेरेसवर कुणी बार चालवत असेल तर तो अवैध समजून कारवाई होऊन मूळ परवाना रद्द होऊन दंडही आकारण्याचीही तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपुर शहरात अवैध टेरेस बार सुरू असून राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तसेच पोलिसांकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे, तसेच राज्यात टेरेस बार अवैध ठरविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन परवाने रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रकाशित झाली होती.
(२) व (३) शासन परिपत्रक, दिनांक २७/०९/२०१८ नुसार फक्त तारांकित मानांकन प्राप्त असलेल्या हॉटेल आस्थापनामध्ये कंपोझिट एफएल-३ अनुज्ञप्ती अन्वये रुफ टॉप क्षेत्रामध्ये मद्यविक्रीस परवानगी दिली जाते. त्यानुसार नागपूर शहरात ओपन टेरेस वरील कोणत्याही रेस्टॉरंटला एफएल-३ अनुज्ञप्ती प्रदान करण्यात आलेली नाही.

मुंबई विदेशी मद्य नियमावली व अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीचा भंग केल्यास महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ५४, ५६ व १०४ अंतर्गत परवाना रद्द/ निलंबन करण्याची अथवा दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे.

माहे डिसेंबर, २०२५ ते फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत नागपूर शहरात एफएल-३ अनुज्ञप्ती कार्यरत असलेल्या विविध इमारतींच्या ओपन टेरेसची तपासणी केली असता पाच ठिकाणी विना परवाना मद्यविक्री केल्याबाबत विसंगती प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. त्याबाबत जिल्हाधिकारी यांचे स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील सिडकोने विक्री केलेल्या भूखंडास वास्तुविशारद अवैध पध्दतीने परवाना देत असल्याबाबत

**(३२) * ७४९० श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात सिडकोने विक्री केलेल्या भूखंडावर काही बांधकाम परवाना विभागातील अधिकारी बांधकाम विकासकांसोबत संलग्न काम करणाऱ्या वास्तुविशारदकडून नकाशा बनवणे व त्याव्यतिरिक्त बांधकाम करून अवैध पध्दतीने परवाना मिळवून देत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे नव्याने विकसित होणाऱ्या इमारतीचा मंजूर नकाशा व विक्री करत असताना घर विकत घेणाऱ्या ग्राहकाला दाखवण्यात येणाऱ्या booklet किंवा ब्रोशर यामध्ये मोठी तफावत असून लोकांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कौन्सिल ऑफ आर्किटेक्ट व सिडकोच्या दक्षता विभागाकडे वास्तुविशारद चुकीच्या पध्दतीने परवानगी मिळवित असल्याबाबतच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन APA या आर्किटेक्ट कंपनीला काळ्या यादीत टाकून या कंपनीने design केलेल्या इमारतींची पाहणी करून परवाने तात्काळ रद्द करण्याबाबत तसेच यास जबाबदार आर्किटेक्ट, बांधकाम व्यावसायिक व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) सिडको महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या विकास परवानग्या या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (MRTP) तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR), २०२० व इतर संबंधित कायदे व नियमावलीनुसार मंजूर केल्या जातात. विकास परवानगीच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांची छाननी ऑनलाईन प्रणाली जसे की, Softech, AutoDCR, COPAS व BPMS याद्वारे समान निकषांवरच करण्यात येते ज्यामुळे प्रक्रिया नोंदणीकृत पध्दतीने, पारदर्शक आणि नियमबध्द राहते. विकास परवानगी दिल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate - OC) देण्यापूर्वी अधिकृत छाननी अधिकारी यांचेमार्फत स्थळ पाहणी करुन तपासणी करण्यात येते. बांधकामे हे मंजूर नकाशाप्रमाणे असल्याचे शहानिशा केल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. स्थळ पाहणी दरम्यान मंजूर नकाशाव्यतिरिक्त बांधकाम केलेले असल्यास अशा स्थितीत सदरचे बांधकाम एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR), २०२० नुसार नियमित करणे शक्य असल्यास शासनाचे दिनांक १५/०३/२०२४ व नवी मुंबई महानगरपालिकेचे दिनांक ०६/०६/२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार व सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार दंडात्मक शुल्क / तडजोड शुल्क आकारुन नियमितीकरण करण्यात येते. याव्यतिरिक्त नियमाकूल न होणारे किंवा कोणत्याही प्रकारे नियमितीकरणास अपात्र असे अतिरिक्त बांधकाम आढळल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार कारवाई करण्यात येते. दरम्यान सिडको महामंडळाच्या दक्षता विभागाकडे अतिरिक्त सदनिकांचे बांधकाम केल्यासंदर्भात APA आर्किटेक्ट श्री.अतुल पटेल यांचेविरुध्द तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या प्राथमिक चौकशीअंती विकासकाने केलेले अतिरिक्त बांधकाम सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार दंडात्मक शुल्क आकारुन नियमितीकरण करण्यात आले आहे.

ग्राहकांना विकासकांकडून दाखवण्यात येणाऱ्या ब्रोशर/बुकलेट मधील माहिती आणि मंजूर नकाशा किंवा प्रत्यक्ष बांधकाम यांतील तफावत या स्वरूपाचे मुद्दे हे प्रामुख्याने विकासक–ग्राहक यांचेमधील असून सदर बाब सिडकोच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. अशा तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (MahaRERA) यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: नागपूर व ठाणे महानगरपालिकांसह नगरपालिकांमधील कचरा व्यवस्थापन प्रक्रियेत अनियमितता होत असल्याबाबत

**(३३) * ६७२१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घनकचरा व्यवस्थापन आणि वापरलेल्या पाण्यावरील प्रक्रिया याबाबतचा सहामाही अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्यातील महानगरपालिकांना राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालानुसार राज्यातील महानगरपालिकांमध्ये निर्माण होणारा कचरा आणि त्यावरील प्रक्रिया यामध्ये तफावत असून राज्यातील अनेक महानगरपालिकांच्या कचरा व्यवस्थापनात सुधारणा आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबाजवणीकरीता नगरपालिका व महानगरपालिकामध्ये कचऱ्याचे योग्य वर्गीकरण होणे अत्यावश्यक असून राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाने राज्यातील महानगरपालिकांना दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकांनी त्यांच्या घनकचरा आणि जल व्यवस्थापनाची सद्य:स्थिती आणि प्रगतीचा अहवाल नियमितपणे सादर करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विशेषत: नागपूर व ठाणे महानगरपालिका व या जिल्ह्यातील नगरपालिका यांची कचरा प्रक्रियेत अनियमितता होत असून सदर प्रक्रियेतील अनियमिततेस जबाबदार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शासनाने राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकामधील कचरा व्यवस्थापन प्रक्रियेला गती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवादाने मूळ अर्ज क्र. ६०६/२०१८ मध्ये दिनांक ०४/०५/२०२३ रोजीच्या सुनावणीदरम्यान राज्यातील घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने सहामाही अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून त्याबाबतचा सहामाही अहवाल विहीत नमुन्यामध्ये वेळावेळी मा.राष्ट्रीय हरित लवादास सादर करण्यात येत आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या दिनांक १७/१२/२०२५ रोजीच्या आदेशामध्ये राज्य शासनाकडून विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्माण होणारा कचरा आणि त्यावर करण्यात येणारी प्रक्रिया यानुषंगाने सादर करण्यात आलेल्या माहितीमध्ये काही तफावत असल्याचे नमूद करुन सुधारीत अहवाल पुढील सुनावणीपुर्वी सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी यापुर्वी सादर केलेल्या माहितीची पडताळणी करण्यात येत आहे व तद्नंतर त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल मा.राष्ट्रीय हरित लवादास सादर करण्यात येणार आहे.

सद्य:स्थिती राज्यातील ४११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी ३५६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मंजुरी देण्यात आलेल्या प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर असून माहे ऑक्टोबर, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच, १८७ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे जुन्या साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याचे प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी १४२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उर्वरित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून माहे ऑक्टोबर, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

ठाणे जिल्ह्यातील १० व नागपूर जिल्ह्यातील २१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी अनुक्रमे ०४ व १९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) लागू नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील धान खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत

**(३४) * ७२२९ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील धान पट्टयात यंदा धानाचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाल्याने व शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपले धान खाजगी व्यापारांना अल्प दराने विकावे लागले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी दिवाळीच्या पूर्वी शासकीय धान खरेदी केंद्र सुरू करावे असे आदेश असताना खाजगी व्यापाऱ्यांचा नफा होण्यासाठी धान खरेदी केंद्र सुरू करण्यात आले नसल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुमसर तालुक्यातील धान पट्टयात डिसेंबर महिन्यापर्यंत शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू न झाल्याबाबत जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

पणन हंगाम २०२५-२६ मध्ये तुमसर तालुक्यात (जि.भंडारा) ३५ धान खरेदी केंद्र सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने भाडेतत्त्वावर दिलेल्या मैदानांचा केवळ खेळासाठीच वापर करण्याबाबत

**(३५) * ६५८१ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पश्चिम उपनगरातील बहुतांश मैदाने विविध संस्थांना भाडेतत्त्वावर दिली असून मुंबईच्या पश्चिम उपनगरातील अंधेरी, गोरेगाव, कांदिवली, मालाड, बोरिवली, दहिसर परिसरातील सार्वजनिक मैदानांचा उपयोग खेळासाठी न करता खासगी कार्यक्रम, मेळावे, धार्मिक-सांस्कृतिक उपक्रम आणि व्यावसायिक इव्हेंटसाठी होत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका हद्दीतील मैदानांचा वापर केवळ खेळासाठीच व्हावा याबाबतची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत असून, अनेकदा ही मैदाने अतिक्रमणे, व्यावसायिक वापर किंवा अयोग्य देखभालीमुळे खेळासाठी अनुपलब्ध ठरत असून यावर उपाय म्हणून राज्यातील महानगरपालिकांनी

शहरांमध्ये 'क्रीडा नर्सरी' सारखे प्रकल्प सुरू करून लहान मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण करावी तर काही ठिकाणी मैदाने आरक्षित ठेवून खेळाडूंसाठी सुविधा पुरवण्यावर भर दिला जावा जेणेकरून मैदानांचा मूळ उद्देश (खेळ) कायम राहील आणि नागरिकांना त्याचा लाभ घेता येईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक आरक्षित भूभाग विकसित करण्यासाठी आणि सार्वजनिक उद्दिष्टासाठी वापरात येण्याकरता महानगरपालिकेने एक धोरण बनवले असून ज्यामध्ये यापूर्वी दत्तक तत्त्वावर तसेच काळजीवाहू तत्त्वावर ज्या काही एकूण ३० उद्यान आणि मनोरंजन मैदानाची जागा देण्यात आलेल्या आहेत आणि महानगरपालिकेने नवीन धोरणानुसार ज्या काही २२ ते २४ जागा विविध संस्थांना अकरा महिन्यांच्या करारावर दिल्या आहेत. त्या सर्व मोकळया जागांसाठी एकच सर्वंकष धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परंतु काही मोकळया जागा विविध संस्थांनी दत्तक तत्त्वावर तथा काळजीवाहू तत्त्वावर देखभाली करता आपल्या ताब्यात घेऊन मालकी हक्क दाखवून मुंबईतील मोठी मैदाने खेळांसह सभा, संमेलने, राजकीय मेळावे व इतर अन्य कारणाकरीता वापरली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कार्यक्रमामुळे मैदानावर मंडप स्टेज उभारले जातात यामुळे मैदानांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, मुंबईत पुरेशी खेळांसाठी जागा नसताना मैदाने अन्य वापरासाठी दिली जात असल्यामुळे याचा त्रास नवोदित खेळाडूना, विविध क्रिडा संघटनाना होत असून मैदान एक दिवसासाठी जरी घेतले तरी याची पूर्व तयारी करीता संबंधित ४ ते ५ दिवस आगोदर सदर मैदाने ताब्यात घेतात त्यामुळे खेळाडूंचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पश्चिम उपनगरातील विद्यार्थी आणि तरुणाईची मैदानाअभावी मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून, पश्चिम उपनगरातील बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध संस्थांना भाडेतत्त्वावर दिलेली मैदाने वर्षभर केवळ खेळासाठीच वापरली जावीत, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने पश्चिम उपनगरातील कोणतेही मैदान खाजगी संस्थांना भाडेतत्वावर दिलेले नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेने यापूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रचलित धोरणानुसार पश्चिम उपनगरातील ७ भूभाग काळजीवाहू तत्वावर व १२ भूभाग दत्तक तत्वावर विविध संस्थांना दैनंदिन देखभालीकरीता दिले आहेत. तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७(अ) च्या तदतुदीनुसार मैदानांवर खेळांच्या स्पर्धा, धार्मिक कार्यक्रम व जाहीर सभा यांकरीता एका वर्षात ४५ दिवसांपेक्षा जास्त होणार नाही, अशा कालावधीकरीता आवश्यक शुल्क आकारुन तात्पुरत्या वापराकरीता महानगरपालिकेमार्फत परवानगी दिली जाते.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील मैदानांचा वापर प्रामुख्याने खेळांकरीता करण्यात येतो. तरी, मा.सदस्य यांनी केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने सकारात्मक विचार करता येईल.

(३) आजमितीस महानगरपालिकेची उद्याने, मैदाने व मनोरंजन मैदाने दत्तक तत्वावर / काळजीवाहू तत्वावर देण्याकरीता धोरण अस्तित्वात नाही. तथापि, यापूर्वी अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेकडील दिनांक १८/१०/२००६ रोजीचे मंजूर प्रचलित धोरणानुसार महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या अखत्यारितील एकूण ८ भूभाग काळजीवाहू तत्वावर व १८ भूभाग दत्तक तत्वावर विविध

संस्थांना दिलेले आहेत. तथापि, सदर धोरणामध्ये आरक्षित जागा हस्तांतरीत करण्याबाबत कोणतीही लिलावात्मक कार्यपध्दती अस्तित्वात नसून पारदर्शकता नसल्याने सदर धोरणास स्थगिती देण्याबाबत शासनास प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शासन नगरविकास विभागाकडील दिनांक ०१/१२/२००७ रोजीचे पत्रान्वये सदर धोरणास पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त धोरणाचे स्थगितीपूर्वी विविध संस्थांना देण्यात आलेल्या भूखंडांबाबत शासनाचे उक्त दिनांक ०१/१२/२००७ रोजीचे पत्रानुसार जैसे-थे परिस्थिती ठेवण्यात आलेली आहे.

तद्नंतर, महानगरपालिकेच्या अखत्यारितील मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्त्वावर देण्याबाबत नवीन धोरण तयार करण्यासाठी समिती गठीत केली होती. सदर समितीने सादर केलेल्या प्रारुप प्रस्तावित धोरणावर सामान्य जनतेच्या हरकती/ सूचना इत्यादी विचारात घेऊन त्यानुसार प्रतावित धोरणाचा मसूदा अंतिम करुन महानगरपालिकेकडील दिनांक १८/०३/२०२४ रोजीचे पत्रान्वये शासनाचे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. महापालिकेने सादर केलेल्या प्रस्तावित धोरणाच्या अनुषंगाने विचारविनिमय होऊन त्यास मंजूरीच्या अनुषंगाने निर्णय होण्याचे प्रस्तावित आहे.

(४) व (५) अशी बाब नाही.

(६) सदर मैदानांमध्ये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७(अ) च्या तदतुदीनुसार खेळांच्या स्पर्धा, धार्मिक कार्यक्रम व जाहीर सभा यांकरीता एका वर्षात ४५ दिवसांपेक्षा जास्त होणार नाही, अशा कालावधीकरीता आवश्यक शुल्क आकारुन तात्पुरत्या वापराकरीता महापालिकेमार्फत परवानगी दिली जाते. जेणेकरुन, जास्तीत जास्त दिवस मैदाने खेळासाठी उपलब्ध राहतील.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील खासबाग कुस्ती मैदानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३६) * ७०७३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी रोमच्या धर्तीवर बांधलेल्या खासबाग कुस्ती मैदानाची दुरवस्था झाली असून पैलवांनाना साहित्य ठेवण्याकरीता स्टेजची व्यवस्था, तसेच आंघोळीसाठी स्वच्छता गृहे नसून मैदानात पाच फुटांपर्यंत गवत व झुडूपे वाढली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशभरात कुस्ती खेळणाऱ्या पैलवानांना कोल्हापूरच्या खासबाग कुस्ती मैदानाचे खास आकर्षण असते, एकदा तरी या आखाड्यातील माती अंगाला लागावी यासाठी अनेक पैलवान इच्छाा करत असतानाही कुस्तीची पंढरी अशी ओळख असलेल्या कोल्हापुरातील खासबाग कुस्त्याचे मैदान दिनांक २० एप्रिल, १९१२ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जनतेला अर्पण केले असून, राजर्षी शाहू खासबाग कुस्ती मैदानाचे धिम्या गतीने सुरु असलेले बांधकाम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी येथील पैलवानांनी व नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी उभे केलेले कुस्तीचे वैभव कोल्हापूर महानगरपालिकेने जपावे तसेच मैदान सुस्थितीत उपलब्ध करुन देण्याची मागणी कोल्हापुर जिल्ह्यातील अनेक पैलवानांनी केली असून त्यानुषंगाने खासबाग कुस्ती मैदानाचे अपूर्ण असलेले काम, स्टेजचे बांधकाम तातडीने पूर्ण करून मैदानाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद सन २०२४-२५ या योजनेंतर्गत राजर्षी शाहू खासबाग कुस्ती मैदान नुतणीकरण, जतन, संवर्धन व पुनर्बांधणी करण्यासाठी शासनाच्या दिनांक ३०/०९/२०२४ च्या शासन निर्णयान्वये रुपये २५.१० कोटी निधी मंजूर केला असून ठेकेदारामार्फत कामे सुरु करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस सदनिका हस्तांतरित न करता विकासकाने सदनिकांची परस्पर विक्री केल्याबाबत

**(३७)** * **६९१६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेला काही सदनिका हस्तांतरित करुन देणे बंधनकारक असताना त्या सदनिका विकासकाने परस्पर विक्री केल्याप्रकरणाची सखोल चौकशी झाली असून त्यानुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्तांकडे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये सादर करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी अहवाल प्राप्त होऊनही सदर प्रकरणाच्या नस्ती देखील गहाळ झाल्यामुळे उक्त प्रकरणी कार्यवाही /कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही/ कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे-कल्याण, सि.स.नं. ३४८०/ २ ते १२ या भुखंडावरील बांधकामाबाबतची नस्ती कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागातून गहाळ झाली होती. त्यामुळे महानगरपालिकेच्या इतर विभागाकडील सदर नस्तीमधील उपलब्ध बांधकाम नकाशे व परवानगीच्या आधारे दुय्यम नस्ती तयार करण्यात आली.

सदर गहाळ नस्ती प्रकरणाबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने प्राथमिक चौकशी केली. सदर चौकशीच्या आधारे श्री.कुणाल ससाणे, सर्व्हेअर, नगररचना, कडोंमपा यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. संबंधिताचा खुलासा प्राप्त झाला असून तो प्रशासनाने अमान्य करुन त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणाबाबत श्री.कुणाल ससाणे, सर्व्हेअर, नगररचना, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या पुनर्बांधणीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३८) * ६५६६ श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचा शिक्षण विभाग गुणवत्तावाढीसाठी विविध प्रकारचे प्रयत्न करीत असला तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पुनर्बांधणीसाठी तोडलेल्या बहुतांश शाळांचे बांधकाम प्रलंबित असून समायोजित केलेल्या विद्यार्थ्यांना दूरच्या शाळेत पायी जावे लागत असल्याची बाब दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील अनेक शाळांचे प्रश्न प्रलंबित असून मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांचे घटते प्रमाण, पुनर्बांधणीसाठी तोडलेल्या शाळांचे प्रलंबित बांधकाम, समायोजित विद्यार्थ्यांची दूरच्या शाळेत पायपीट, इंग्रजी माध्यमांना तुलनेने प्राधान्य, अपुरी शिक्षक संख्या आदी विविध कारणांमुळे विद्यार्थ्यांच्या समस्येत वाढ होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत सद्य:स्थितीत अपुरा शिक्षकवृंद असल्याने त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असून वरील सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर मराठी शाळांची विद्यार्थीसंख्या वाढविणे, प्रलंबित शाळा बांधकामे तातडीने पूर्ण करणे, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळणे व शिक्षकांची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

अतिधोकादायक १० शालेय इमारतींचे तोडकाम करण्यात आले असून सदर शाळांतील विद्यार्थ्यांचे स्थलांतर नजीकच्या महानगरपालिकेच्या शाळांमध्ये करण्यात आले आहे.

(३) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत मराठी शाळामधील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढीसाठी पालकांचा इंग्रजी भाषेकडे असलेला ओढा लक्षात घेवून, सदर सर्व मराठी शाळा या सेमी इंग्रजी करण्यात आलेल्या आहेत. सदर शाळांमध्ये विज्ञान व गणित हे विषय प्रामुख्याने इंग्रजीमध्ये शिकविण्यात येत आहेत. तसेच पुनर्बांधणीसाठी घेण्यात आलेल्या इमारतींमधील मराठी माध्यमांच्या शाळांसह हिंदी, उर्दू, इंग्रजी व त्याचबरोबर इतर भाषिक माध्यमाच्या शाळा नियमित सुरु आहेत. महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत घड्याळी तासिका तत्वावर शिक्षक नेमणूक करण्याचे अधिकार मुख्याध्यापक यांना देण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रलंबित शाळांची पुनर्बांधणी तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने नवीन इमारतीच्या बांधकामाच्या आराखड्याची मंजुरी व त्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या मिळवण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया-बालाघाट (जि.गोंदिया) राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता बांधकामे पूर्ण करण्याबाबत

**(३९) * ६६४७ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया-बालाघाट (जि.गोंदिया) राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेली रस्ता बांधकामे अत्यंत धीम्यागतीने सुरु असल्याने अपूर्णावस्थेत असून सदर महामार्गावरील रस्ता बांधकामादरम्यान आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना, दिशादर्शक फलक, लाईटिंग व्यवस्था व वाहतूक नियंत्रण व्यवस्था योग्यरीत्या न राबविल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असून अपघातांमध्ये वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्ता वारंवार दुरुस्त करावा लागत असून अपघातांमुळे प्रशासकीय यंत्रणेवर वाढीव खर्च येत होत असल्यामुळे अप्रत्यक्षपणे शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर राष्ट्रीय महामार्गावर सुरु असलेल्या रस्ता बांधकामांमध्ये झालेल्या विलंब व अपघातांच्या कारणांची दखल घेऊन रस्ता व कामांची गुणवत्ता न तपासणाऱ्या संबंधित कंत्राटदाराची तांत्रिक व प्रशासकीय चौकशी करुन कामे विहित कालावधीत तसेच गुणवत्तापूर्ण व सुरक्षित पध्दतीने पूर्ण करण्याबाबत निदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) बालाघाट ते गोंदिया राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४३ वरील रावणवाडी ते गोंदिया मार्ग (कि.मी. ८/४०० ते कि.मी. १६/ ९००) ही लांबी राष्ट्रीय महामार्ग विभाग (सा.बां.) यांच्या अखत्यारित येते. तसेच रावणवाडी ते महाराष्ट्र/ मध्यप्रदेश राज्यसीमा हा भाग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छिंदवाडा यांच्या अधिपत्याखालील आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४३ वरील रावणवाडी ते जिल्हाधिकारी कार्यालय चौक, गोंदिया (कि.मी. ८/४०० ते कि.मी. २१/४३०) व गोंदिया रामटेक राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ वरील पोलीस मुख्यालय कारंजा ते जिल्हाधिकारी चौक, गोंदिया (कि.मी. ३९/७२० ते कि.मी. ४२/४७१) या भागातील सिमेंट काँक्रीटद्वारे चौपदरीकरणाच्या कामास फेब्रुवारी, २०२३ मध्ये मंजुरी देण्यात आली आहे. सदर कामास मार्च, २०२४ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला असून कामाची मुदत १८ महिने होती.

सद्य:स्थितीत १४.८४८ कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणापैकी १०.७९१ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम जुलै, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

पोलीस विभागाच्या अहवालानुसार सुरक्षा व्यवस्था व वाहतूक नियंत्रण या कारणामुळे अपघातांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

सुरक्षेच्या दृष्टीने कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना, दिशादर्शक फलक इ. व्यवस्था करण्यात आलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

गुणवत्ता देखरेखीसाठी स्वतंत्र प्राधिकृत अभियंता नियुक्त करण्यात आले असून मानकानुसार आवश्यक चाचण्या व तपासण्या करण्यात येतात. सदर कामाचा दोषदायित्व कालावधी १० वर्षे आहे.
(४) भूसंपादन प्रक्रियेस लागलेला अतिरिक्त कालावधी विद्युतवाहिन्या व जलवाहिन्या यांच्या स्थलांतरातील अडचणी, अतिक्रमण इ. कारणांमुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. तथापि, उर्वरित काम जुलै, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## परळ (मुंबई) येथील राजे एडवर्ड स्मारक (के.ई.एम.) रुग्णालयात मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४०) * ७२७५ श्री.श्रीकांत भारतीय, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे : तारांकित प्रश्न क्रमांक २५७२ ला दिनांक १० जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयात (के.ई.एम.) संपूर्ण देशातून रुग्ण उपचार करण्यासाठी येत असून उपचारासाठी आलेल्या रुग्णांना व नातेवाईकांना केवळ नोंद करण्यासाठी दोन ते तीन तास उभे राहावे लागत असल्यामुळे रुग्णांना त्वरित उपचार मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात पंख्याचीही व्यवस्था नसून नवीन इमारत १३ मजली असून तेथील उद्वाहनांमध्येही वारंवार बिघाड होत असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राजे एडवर्ड स्मारक (के.ई.एम.) रुग्णालय, मुंबई येथे उपचारासाठी दाखल केलेल्या रुग्णांच्या एम.आर.आय. व सि.टी. स्कॅन चाचणीसाठी पाच ते सहा दिवसांपेक्षा जास्त काळ विलंब होत असल्याने रुग्णांबरोबर त्यांचे नातेवाईक देखील त्रस्त असून, सि.टी. स्कॅन, एम.आर.आय. सारख्या अत्यावश्यक मशीन बंद असून सदर रुग्णालयात एम.आर.आय. व सि.टी. स्कॅन मशीन तसेच रुग्णांना विविध चाचण्या करण्याकिरता बेड उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, सदर रुग्णालयातील डॉक्टर व अधिकारी यांच्या संगनमताने खाजगी रक्त चाचण्या करणाऱ्या प्रयोगशाळा ह्या रुग्णांची आर्थिक लूट करित आहेत, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, उक्त रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील बेडची संख्या सुमारे २५० च्या आसपास असून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता राजे एडवर्ड स्मारक (के.ई.एम.) रुग्णालयात, मुंबई तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अन्य सार्वजनिक रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील बेडची संख्या दुप्पट करणे गरजेचे असून यासाठी शासनाने उपाययोजना केल्या आहेत काय,

(६) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दखल घेऊन केईएम रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना तातडीने वैद्यकीय उपचार तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच रुग्ण नोंदणी करण्याकरीता प्रशासनाने तातडीने ऑनलाइन प्रणाली लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची आर्थिक लुट करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राजे एडवर्ड स्मारक (के.ई.एम.) रुग्णालयात २३ नोंदणी कक्ष असून, हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉरमेशन सिस्टीम (HMIS) ही सुविधा कार्यान्वित आहे. त्यामुळे नोंदणीकरीता प्रतिरुग्ण १ मिनीट इतका वेळ लागतो.

(२) उपरोक्त विषयांन्वये रा.ए.स्मा. रुग्णालयातील नवीन इमारत (बहुमजली इमारत) ही तळमजला +१३ मजल्याची असून या इमारतीमध्ये एकूण ११ उद्वाहनांपैकी ६ उद्वाहन कार्यरत आहेत. प्रसंगी एखादी लिफ्ट बंद पडल्यास संबंधित परिरक्षण कंत्राटदाराकडून लिफ्ट तातडीने सुरु करण्याबाबत आवश्यक कार्यवाही रुग्णालयामार्फत पार पाडण्यात येते.

सद्य:स्थितीत रा.ए.स्मा. रुग्णालयातील सर्व बाह्यरुग्ण विभाग, कक्ष आणि इतर विभाग या ठिकाणी हवेकरीता मुबलक पंख्याची व्यवस्था आहे. याव्यतिरीक्त उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी तात्काळ पंख्यांची व्यवस्था करण्यात येते.

(३) मुंबईतील केईएम रुग्णालयात सद्य:स्थितीत ०१ एम.आर.आय. मशिन व ०२ सि.टी. स्कॅन मशिन २४ तास आणि ७ दिवस सुरु आहेत. एम.आर.आय. व सि.टी. स्कॅनसाठी बाह्यरुग्णांची प्रतिक्षा यादी असते. तथापि, अत्यावश्यक रुग्णांचे एम.आर.आय. व सि.टी. स्कॅन त्याच दिवशी आणि आंतररुग्णांचे एम.आर.आय. व सि.टी. स्कॅन १ ते २ दिवसात केले जातात.

(४) हे खरे नाही.

(५) आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्वानुसार आय.सी.यु. बेड्स (ICU Beds) चे प्रमाण एकूण आंतरभरती रुग्णसंख्येच्या ५% ते १०% आहे. के. ई. एम रुग्णालयातल्या आय.सी.यु. बेड्स (ICU Beds) ची संख्या ३१२ आहे. एकूण आंतरभरती रुग्णसंख्येची संख्या १९५० गृहीत धरल्यास उपलब्ध बेड्सचे प्रमाण अंदाजे १६% आहे, जे जागतिक नियमावलीच्याही अधिक आहे. सदर रुग्णालयात जागेअभावी आय.सी.यु. बेड्स वाढविणे सद्य:स्थितीत शक्य नाही.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर ऑनलाईन संकेतस्थळ (Online Website) सुरु असून, तेथे हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉरमेशन सिस्टीम (HMIS) ही सुविधा कार्यान्वित आहे. तसेच प्रत्येक रुग्णालयामध्ये असलेल्या रिकाम्या खाटांच्या डॅशबोर्ड (Dashboard) उपलब्ध करुन देण्याची बाब महानगरपालिकेच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची फसवणूक करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्याबाबत

**(४१) * ६८९९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'दर्शन डेव्हलपर्स' या विकासकाने त्याच्या बँक खात्यामध्ये नगण्य रक्कम असतानाही ५३१ व्यावसायिक आणि निवासी जागांच्या प्रकल्पांसह अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) प्रकल्प हाती घेतले असून अनेक पात्र झोपडीधारकांचे संक्रमण, घरांचे साडेतीन कोटी रुपयांहून अधिकचे भाडे (ट्रान्झिट रेंट) थकविले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाने रूपये ३२० कोटी एवढ्या रकमेचे कर्ज घेतले असून अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे काम हाती घेऊन त्रयस्थ व्यक्ती किंवा कंपन्यांकडून प्रकल्प राबवित असल्याचे गंभीर निरीक्षण मा.मुंबई उच्च न्यायालयाने या विकासकाविरुध्द दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान केले असून याविषयी चौकशी करण्याचे निर्देश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासाच्या खात्यात आवश्यक असलेली रक्कम नसतानाही हे प्रकल्प विकासकाला देणाऱ्या एसआरएच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे व करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर विकासकाकडून हे प्रकल्प काढून अन्य विकासकाला देण्याबाबत तसेच दर्शन डेव्हलपर्स या विकासकास काळ्या यादीत टाकून एसआरए प्राधिकरण व शासकीय प्रशासनांची फसवणूक करणाऱ्या विकासकाविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दर्शन डेव्हलपर्स यांच्यामार्फत न.भू.क्र. १६३ (अ)/२ (पार्ट), मौजे आकुर्ली, कांदिवली (पूर्व) येथे झो.पु. योजना राबविण्यात येत असून सदर योजनेच्या पुनर्वसन इमारतीस दिनांक १७/१०/२०२५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तसेच, सदर योजनेतील विक्री घटकांच्या ५३१ सदनिकांच्या (५१८ निवासी + १३ अनिवासी) इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेमधील ३३ झोपडपट्टीधारकास रुपये ३,५९,२४,७०१/- थकीत भाड्यांपैकी विकासकाने दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये ३० झोपडीधारकांच्या वैयक्तिक नावाने एकूण रुपये ६९,४५,३३८/- रुपयाचे धनादेश जमा केले आहेत. तसेच, रुपये २,९०,१३,३६३/- एवढ्या रकमेचा डी.डी. प्राधिकरणाकडे जमा केलेला असून त्यापैकी २७ झोपडीधारकांच्या बँक खात्यावर घरभाडे रक्कम अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित ०६ झोपडीधारकांची बँक खाते तपशिल प्राप्त न झाल्याने घरभाडे अदा करण्यात आलेले नाही.

(२) रिट याचिका क्र. ४८३६/२०२५ मध्ये दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी विकासकाची चौकशी करुन मा.उच्च न्यायालयात अहवाल सादर केला आहे.
(३) योजना मंजूरीच्या वेळी विकासकाच्या आर्थिक क्षमतेबाबतचे परिशिष्ट-३ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वित्त विभागामार्फत घेण्यात आलेले आहे.
(४) विकासकाने झो.पु. प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय सहविकासक घेतल्याचे निदर्शनास आले आहे. झो.पु. प्राधिकरणाच्या दिनांक २३ मार्च, २०१५ रोजीच्या विकासक बदलाबाबत पालन करावयाच्या आदेशातील तरतुदीनूसार विकासकाने रुपये २,४९,९५,२००/- एवढे शुल्क भरणे आवश्यक होते. मात्र, सदर शुल्क न भरल्याने प्राधिकरणाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रानूसार विकासकाविरुध्द समता नगर, पोलीस ठाणे, कांदिवली येथे तक्रार दाखल केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील औषध निरीक्षक पदांसह अन्य रिक्त पदे भरणेबाबत

**(४२) * ७३५४ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागात औषध निरीक्षकासह इतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदांमुळे बनावट, कालबाह्य औषधे, साठेबाजी, नियमबाह्य व्यवहार वाढले असून जिल्ह्यात औषध तपासणीची यंत्रणा अपुरी असून प्रभावीपणे कार्यवाही करण्यास मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विभागाच्या नियंत्रणाखाली डॉक्टर, घाऊक औषध वितरक, किरकोळ औषधे, रक्तपेढ्या, ॲलोपॅथीक/आयुर्वेदिक औषध उत्पादन करणाऱ्या कंपन्या आदी घटक येत असून त्यांची तपासणी करण्याची जबाबदारी औषध निरिक्षकावर असून अपुऱ्या पदांमुळे कर्मचाऱ्यांच्या कामावर ताण पडत असून मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन विभागात औषध निरीक्षकासह इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, सदर रिक्त पदे भरण्यास होत असलेल्या विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध विभागात औषध निरीक्षक व सहायक आयुक्त (औषधे) या संवर्गात अनुक्रमे ०६ व ०२ पदे मंजूर असून त्यापैकी अनुक्रमे ०६ व ०१ पदे रिक्त आहेत. तसेच, अन्न विभागात सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी या संवर्गात अनुक्रमे ०३ व १२ पदे मंजूर असून त्यापैकी सहायक आयुक्त (अन्न) संवर्गात रिक्त पद नसून अन्न सुरक्षा अधिकारी या संवर्गात ०२ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात औषध निरीक्षक व सहायक आयुक्त (औषधे) यांची अनुक्रमे ०६ व ०१ पद रिक्त आहेत. तथापि, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.

औषध निरीक्षक, गट-ब संवर्गाच्या एकूण १०९ पदांच्या पदभरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २९/०७/२०२५ रोजी जाहिरात क्रमांक ११६/२०२५ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर पदांकरीता लेखी परीक्षा दिनांक २२/०३/२०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. तसेच, उक्त जाहिरातीत अतिरिक्त ४५ पदांचा नव्याने समावेश करून एकूण १५४ पदांची पदभरती करण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दिनांक १२/०१/२०२६ रोजी अतिरिक्त मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच, सहायक आयुक्त (औषधे), गट-अ संवर्गाच्या पदभरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्रमांक २०२/२०२२, दिनांक १९/०३/२०२२ रोजी १५ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून त्याअनुषंगाने लेखी परिक्षेअंती मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यात अवैधरित्या दारु विक्रीच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(४३) * ६७८५ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहर आणि जिल्ह्यात विनापरवाना आणि भेसळयुक्, अवैध दारु विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून अवैध दारु विक्रीकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष होत असून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अवैध दारु विक्रीला आळा घालण्यासाठी कोणतीच कार्यवाही न करता अवैध दारु विक्रेत्यांना पाठिशी घालण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने तसेच अवैध दारु विक्री रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे नाही.

नांदेड शहर आणि जिल्ह्यात अवैध मद्याच्या संदर्भात माहे डिसेंबर, २०२५ मध्ये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :

(रुपये लक्ष)

| एकूण गुन्हे | अटक आरोपी | जप्त वाहने | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २३४ | २७२ | ४३ | ७२ |

(२) नांदेड जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक १५/०२/२०२६ या कालावधीमध्ये अवैध मद्यासंदर्भात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतुदी नुसार पुढीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्याच्या कारवाया केल्या आहेत :-

(रुपये लक्ष)

| एकूण गुन्हे | अटक आरोपी | जप्त वाहने | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २१६५ | २३४३ | १९९ | ३८९ |

तसेच, प्रतिबंधक कार्यवाही खाली उक्त कालावधीत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ९३ अंतर्गत चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्राचे २२४ प्रस्ताव दाखल करून रुपये ९८ लक्ष बंधपत्राची रक्कम वसूल करण्यात आली आहे आणि एमपीडीए अंतर्गत २ प्रस्ताव दाखल करून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अवैध दारू विक्री रोखण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या उपाययोजना :

१. अवैध दारू व्यवसायांवर कार्यकारी क्षेत्रिय अधिकारी, स्थानिक भरारी पथके, विभागीय भरारी पथके यांच्यामार्फत नियमितपणे व सातत्यपूर्वक कारवाई करण्यात येते.

२. पोलीस विभागाच्या मदतीने व संयुक्त मोहिमेद्वारे सराईत गुन्हेगार व त्यांच्या ठिकाणांवर कारवाई करण्यात येते.

३. आंतरराज्य मद्य तस्करी रोखण्यासाठी सीमा तपासणी नाके कार्यान्वित असून प्रमुख राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवर वाहन तपासणी व रात्रगस्त घालण्यात येते.

४. सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ९३ खाली तसेच एमपीडीए कायद्याखाली सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने प्रतिबंधक कारवाया करण्यात येतात.

५. गावठी दारू निर्मूलनासाठी ग्रामपंचायत स्तरावर क्षेत्रिय अधिकारी यांच्याद्वारे भेटी देऊन गावकऱ्यांना अवैध व्यवसायाबद्दल गोपनीयरित्या माहिति देण्याबाबत आवाहन करण्यात येते जेणेकरून त्या गावातील सर्व अवैध व्यवसायांवर ठोस व कडक कारवाई करणे शक्य होते.

६. नागरिकांना अवैध दारू व्यवसायाची तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक, व्हाट्सॲप क्रमांक, मोबाईल ॲप, सुविधा पोर्टल इत्यादी व्यवस्था असलेल्या राज्यस्तरीय राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली असून सदर कक्ष २४ तास कार्यान्वित असतो.

७. अवैध दारू व्यवसायांची त्वरित व परिपूर्ण माहिती विभागास उपलब्ध व्हावी या करीता दारूबंदी गुन्ह्यांची माहिती देणाऱ्या खबऱ्यांना गोपनीयता बाळगून प्रोत्साहनपर बक्षीस देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील कंपनीवर प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादनाविरोधातील कारवाईतंर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत

**(४४)** * **७४७९ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादनाविरोधात येत असलेल्या कारवाई अंतर्गत पुणे जिल्ह्यातील कंपनीवर विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून रुपये ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ एवढ्या रकमेचा मुद्देमाल जप्त करुन

कंपनी सील करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले आहे, तसेच सदर उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून शासनाने काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०१/१२/२०२५ रोजी मे.हायस्ट्रीट इम्पेक्स एलएलपी, कृष्ण कंन्सट्रक्शन, दापोडे गांव, हरीहर कंपाऊंड, भिवंडी, जि.ठाणे या आस्थापनेमधून १) Afzal authentic Flavored Hookah (Chief Commissioner), २) Afzal Authentic Flavored Hookah (४ Seasons), ३) Soex Authentic Herbal Hookah या अन्न पदार्थाचे इन्फॉरमल (अनौपचारीक) अन्न नमुने घेतले होते. अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा, मुंबई यांचे विश्लेषण अहवालानुसार Afzal authentic Flavored Hookah (Chief Commissioner) व Afzal Authentic Flavored Hookah (४ Seasons) हे निकोटिन पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. त्यानुषंगाने दिनांक ३१/१२/२०२५ रोजी मे. हायस्ट्रीट इम्पेक्स एलएलपी, भिवंडी, जि.ठाणे याठिकाणी प्रतिबंधित अन्न पदार्थ प्रकरणी कार्यवाही करण्यात येऊन एकूण किंमत रुपये १९,४५,७६,३२०/- चा साठा जप्त करून संबंधितांविरुध्द नारपोली पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे First Information Report क्र.१३८४ दिनांक ३१/१२/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, अन्न आणि औषध प्रशासनाने दिनांक ०२/०१/२०२६ रोजी मे.सोएक्स इंडिया प्रा.लि., गट नं.२२९/१ व २३०/१, टाकवे गाव, ता.मावळ, जि.पुणे या ठिकाणी सदर आस्थापनेची तपासणी केले असता सदर ठिकाणी Tobacco, Glycerin, Fructose, Sugar Syrup व विविध प्रकारचे फ्लेवर्स या घटक पदार्थापासून विविध फ्लेवर्सचे afzal या ब्रँन्डचे Authentic Flavored Hookah या पदार्थाचे उत्पादन करीत असल्याचे आढळून आल्याने एकूण ५,४८,४८८ किलो इतका रुपये ३१,६७,२१,९८७/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असून सदर आस्थापना सील करण्यात आली आहे. सदर आस्थापनेतून एकूण ६२ अनौपचारिक नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून सदरचे सर्व अन्न नमुने निकोटिन पॉझिटिव्ह आढळुन आले आहेत.

त्यामुळे सदर आस्थापनेने महाराष्ट्र राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त यांचे दिनांक १६/०७/२०२५ रोजीचे प्रतिबंधित आदेशाचे उल्लंघन केल्याने सदर आस्थापना सील बंद केली असून सदर प्रकरणी वडगाव मावळ पोलीस स्टेशन येथे संबंधितांविरूध्द फिर्याद क्र.०६/२०२६ दिनांक ०३/०१/२०२६ दाखल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाथरे व खोपडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील साईभक्त निवास भाविकांसाठी खुले करण्याबाबत

**(४५) * ६५९१ श्री.सत्यजीत तांबे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सिन्नर शिर्डी राज्यमार्गाच्या विस्तारा दरम्यान साईबाबाच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांसाठी पाथरे व खोपडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे रुपये १४ कोटी एवढी रक्कम खर्च करून उभारण्यात आलेले सुसज्ज साईभक्त निवास गत चार वर्षांपासून बंद असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींकरीता कोट्यवधी रकमेचा शासकीय निधी खर्च करून तसेच आधुनिक सुविधांनी बांधूनही त्या वापराविना असल्याने शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भक्त निवास भाविकांसाठी खुले न केल्यामुळे शिर्डीकडे पायी जाणाऱ्या हजारो साईभक्तांना रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला किंवा असुरक्षित ठिकाणी मुक्काम करावा लागत असून, यामुळे महिला भाविकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर साईभक्त निवास बंद असण्याची कारणे काय आहेत, तसेच सुविधांच्या अभावामुळे परिसरात अस्वच्छता वाढत असून भाविकांना मूलभूत सोयींपासून वंचित ठेवणे हे प्रशासकीय नियमांचे उल्लंघन ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पाथरे व खोपडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे रुपये १४ कोटी एवढी रक्कम खर्च करून उभारण्यात आलेले विनावापर असलेले सुसज्ज साईभक्त निवास भाविकांसाठी तात्काळ खुले करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) सिन्नर-शिर्डी हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत शिर्डीकडे पायी चालत जाणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र पालखी मार्ग बांधण्यात आला असून सदर पालखी मार्गावर पाथरे व खोपडी येथे भक्तनिवास सन २०२२ मध्ये बांधण्यात आलेले आहेत. सदर महामार्गाचे काम हायब्रीड ॲन्युटी मॉडेल (HAM) तत्त्वावर करण्यात आले असून सवलतदारामार्फत या दोन्ही भक्तनिवासांची नियमितपणे देखभाल व दुरुस्ती केली जाते.

(३) हे खरे नाही.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या विनंती प्रमाणे दोन्ही भक्त निवास साई भक्तांच्या वापरासाठी वेळोवेळी खुले केले जातात.

(४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार सद्य:स्थितीत दोन्हीही भक्तनिवास परिसर स्वच्छ व सुरक्षित आहे.

(५) व (६) भाविकांची सोय विचारात घेऊन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत दोन्हीही भक्तनिवास श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्यामार्फत व्यवस्थापनाची बाब विचाराधीन असून याबाबत श्री साई संस्थान यांना विनंती करण्यात आली आहे. श्री साईबाबा संस्थानामार्फत अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण गाळेधारकांकडून अतिरिक्त मुद्रांक शुल्क व दंड वसुल करित असल्याबाबत

**(४६)** * **७००० श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी सिडको एन-९ आर-२६ अल्प उत्पन गट अंतर्गत बांधण्यात आलेल्या सन १९९५ मध्ये हस्तांतरित झालेल्या गाळयांचा भाडेपटटी करार सपुष्टांत आला असून सदर भाडेपट्टी कराराचे नुतनीकरण / पुनर्नोंदणी करण्याबाबत कोणतीही पुर्वसुचना अथवा कोणतीही नोटीस न बजाविता परस्पर म्हाडा कार्यालयाकडून गाळेधारकांना १० टक्के दंड आकारण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळेधारक म्हाडाकडे नुतनीकरणाबाबत अर्ज करण्यास गेले असता मुदत संपल्याचे सांगून गाळेधारकांना शुल्क रुपये २१८००/- त्यावर मुद्रांक अधिनियमानुसार दंड रुपये ८६४००/- व मुद्रांक शुल्क रुपये ६२४०/- त्यावर मुद्रांक अधिनियमानुसार दंड रुपये २४९६० /- इतकी रक्कम भरण्याबाबत सक्ती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००८ मध्ये म्हाडा कार्यालयाने गाळेधारकांकडून घराची विक्री विलेख (सेल डिड) व भाडेपट्टी करार (लीज डिड) नोंदणी करुन घेणे आवश्यक व बंधनकारक असतानाही त्यावेळी मुद्रांक शुल्क भरणा करुन नोंदणी करुन घेतलेली नसल्याने सन २०२५ मध्ये मुंद्राक शुल्क किंवा त्यावरील दंड भरण्याबाबत सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील म्हाडा कार्यालयाकडून आकारण्यात येत असलेल्या मुद्रांक शुल्क व अनावश्यक दंडामुळे गाळेधारकांमध्ये असंतोष व नाराजी पसरली असून आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच सन २०२३ मध्ये शासनामार्फत सुरु करण्यात आलेली अभय योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन गाळेधारकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे तसेच सदर अनियमिततेबाबत जबाबदार असणाऱ्या म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येते आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळमार्फत बांधण्यात आलेल्या गाळयांचे वितरण ३० वर्षांकरीता भाडेपट्टा करारनामा नोंदणीकृत करून गाळेधारकांस करण्यात आलेले आहे. सदर करारनाम्यामध्ये करारनाम्याचा कालावधी संपुष्टात येण्यापुर्वीच गाळेधारकाने भाडेपट्टा करारनामा नुतनीकरण करून घेणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

म्हाडा प्राधिकरणाच्या ठराव क्र.७०९४, दिनांक २९/०२/२०२४ नुसार भाडेपट्ट्याची मुदत संपण्यापुर्वी ६ महिने अगोदर नुतनीकरणाकरीता अर्ज न केल्यास ज्यावर्षी नुतनीकरण अर्ज सादर केला असेल त्यावर्षीच्या वार्षिक बाजारमुल्य दराच्या २५ टक्के रकमेवर १०% दंडात्मक रक्कम आकारण्यात येते.

(२) सदर प्रकरणी सन १९९५ साली म्हाडाने वाटप केलेल्या मूळ किंमत रुपये ७८०००/- रकमेवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या तत्कालीन अनुच्छेद २५ नुसार मुद्रांक शुल्क रुपये ६२४०/- व कलम ३९ नुसार दंड रक्कम रुपये २४६९०/- ची नोटीस संबंधित पक्षकार यांना बजावली आहे. तसेच, सन २००९ साली सदर गाळा मूळ पक्षकार यांनी इतर पक्षकार यांना विक्री केल्याचे पत्रात नमूद असल्याने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या तत्कालीन अनुच्छेद २५ नुसार मुद्रांक शुल्क रुपये २१८००/- व कलम ३९ नुसार दंड रक्कम रुपये ८६४००/- ची नोटीस संबंधित पक्षकार यांना बजावली आहे.

(३) मुद्रांक शुल्क विभागाकडून मुद्रांक महानिरीक्षक, पुणे यांचेमार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या परिपत्रकानुसार व मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार संबंधित गाळेधारकांना मुद्रांक शुल्काचा भरणा करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(४) व (५) सन २०२३ मध्ये करण्यात आलेली अभय योजना पुन्हा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे.नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. यांनी औद्योगिक वापरासाठी सुट देण्याबाबत आदेश अंमलात असतानाही विक्रीचा करारनामा अनधिकृतपणे केल्याबाबत

**(४७)** * **६९३५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. यांनी उल्हासनगर नागरी समूहातील मौजे-आंबिवली, मोहने, अटाळी, गाळेगांव आणि वडवली, (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील नागरी कमाल जमीन धारणा अधिनियम, १९७६ चे कलम २० नुसार धारण केलेल्या क्षेत्रापैकी अतिरिक्त करण्यात आलेले क्षेत्र १४२३२२७.३९ चौ.मी यास औदयोगिक वापरासाठी सुट देण्याबाबत आदेश अंमलात असतानाही उक्त कंपनीने मे.रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि. यासोबत विक्रीचा करारनामा अनधिकृतपणे केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास देय असलेल्या जमीन महसूलाबाबतच्या थकबाकीच्या एकूण रुपये सहा कोटी चोवीस लाख ब्याऐंशी हजार चारशे चौसष्ठ इतक्या रकमेचा बोजा मे.नॅशनल रेयॉन कंपनीच्या मालकीच्या मिळकतीवर घेण्यात आलेला असून तलाठी सझा आंबिवली यांनी मौजे मोहने, अटाळी, आंबिवली, गाळेगांव व वडवली या गावातील मे.नॅशनल रेयॉन कंपनीचे मालकीच्या जमिनीचे ७/१२ मध्ये "अनधिकृत व्यवहार" अशी नोंद ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे. नॅशनल रेयॉन कंपनी लि. या कंपनीस BIRF ने दिनांक १६/०७/२००९ रोजीच्या आदेशान्वये आजारी उद्योग म्हणून घोषित केले आहे. सदरचे आदेश AIFR मध्ये कायम केल्यानंतर AIFR चे आदेशाविरूध्द कंपनीने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.६४५०/२०१० दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने AIFR चे आदेश रद्द करून मे. नॅशनल रेयॉन कंपनीच्या रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि. यांच्या समवेत केलेला करारनामा हा विक्री करारनामा असून खरेदीखत नसल्याचे निर्णय दिलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७/०२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाचे सदरचे आदेश कायम केलेले आहेत. तसेच सदर करारनामा आता परस्पर सहमतीने रद्द करण्यात आल्याने जमिनीच्या इतर हक्कात घेण्यात आलेली “अनधिकृत व्यवहार” ही नोंद कमी करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार तहसिलदार यांनी मौजे-आंबिवली, मोहने, अटाळी, गाळेगांव व वडवली येथील जमिनीच्या इतर हक्क सदरी असलेली “अनधिकृत व्यवहार” ही नोंद कमी केलेली आहे.

(२) मौजे, आंबिवली, मोहने, अटाळी, मौजे वडवली, येथील गाळेगाव, ता.कल्याण, जि.ठाणे येथील जमीनीच्या बाबतीत जमीन महसूल, रहिवास व औदयोगिक बिनशेती कराच्या व वाढीव आकाराच्या थकबाकीसाठी मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र नागपूर यांनी केलेल्या लेखापरिक्षणानुसार सन २००१-२००२ ते २०१८-१९ या कालावधी करीता रक्कम रुपये ६.३४ कोटी इतक्या रकमेचा बोजा सदर जमिनीच्या ७/१२ चे इतर हक्क सदरी घेण्यात आलेला आहे.

तद्नंतर कंपनीने मौजे, आंबिवली, मोहने, अटाळी, वडवली व गाळेगाव, येथील सन २००१-२००२ ते २०१८-२०१९ या कालावधी करीता रक्कम रुपये ६.३४ कोटी व पुढील चार वर्षाची (सन २०१९-२० ते सन २०२२-२३) आकारणी रक्कम १.४६ कोटी अशी मिळून रुपये ७.८ कोटी इतकी रक्कम शासनास अदा केलेली आहे. त्यानुसार तहसिलदार कल्याण यांचेकडील दिनांक २३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर गावामधील विचाराधीन मिळकतीच्या ७/१२ च्या इतर हक्क सदरी घेण्यात आलेल्या थकबाकी बाबतच्या नोंदी कमी करण्यात आलेल्या आहेत.

(३) मे. नॅशनल रेयॉन कंपनीचे जमीनीबाबत वरील प्रमाणे कार्यवाही झालेली असल्याने चौकशी व कारवाई करण्याचा प्रश्न उद्रभवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर करण्याबाबत

**(४८) * ६६२६ डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च, वाढती महागाई आणि बाजारभावातील चढउतार लक्षात घेता दरवर्षी केंद्र शासनाकडून जाहीर करण्यात येणाऱ्या किमान आधारभूत किमतीव्यतिरिक्त राज्य शासनाकडून प्रति क्विंटल किंवा प्रति हेक्टर बोनस जाहीर करण्यात येतो, मात्र २०२५ मध्ये असा बोनस जाहीर करण्यात आला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी धान उत्पादकासाठी जाहीर करण्यात आलेला बोनस भंडारा जिल्ह्यातील २३०७ शेतकऱ्यांना अजूनही मिळालेला नाही सन २०२४-२५ च्या खरीप हंगामात नोंदणीकृत शेतकऱ्यांना धान लागवडीखालील जमीन धारणेनुसार प्रति हेक्टरी रुपेय २० हजार या प्रमाणात राशी अदा करण्यासाठी शासन मंजूरी दिली होती काय, भंडारा जिल्ह्यात धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते परंतु यावर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे धानाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची पिके वाहून गेली, तसेच पेरणी, नर्सरी आणि रोवणी पूर्णपणे नष्ट झाल्यामुळे शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली, परंतु त्यामुळे उत्पादन खर्च वाढून उत्पन्नावर गंभीर परिणाम होवून शेतकऱ्यांना आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्पादनात घट झाली असल्यामुळे बाजारभाव मिळत नसल्यामुळे कुटुंबांचा पालनपोषण व शिक्षणाचा खर्च भागवता यावा याकरीता धानाला प्रति हेक्टरी रुपये २५ हजार एवढ्या रकमेचा बोनस देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अवकाळी पावसामुळे पिकांच्या नुकसानीचा तातडीने पंचनामा करण्याचे निर्देश देऊन नुकसान झालेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाची, बाजारभावाची व नफ्याची तुलना करून बोनस देण्याची आवश्यकता असून धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस न मिळाल्यामुळे त्यांच्या उत्पन्नावर व आर्थिक स्थैर्यावर प्रतिकूल परिणाम झाला असून शासनाने धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर करण्याबाबत तसेच भविष्यात धान उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न सुरक्षित रहावे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

अ) खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये भंडारा जिल्ह्यात १,६०,४९० शेतकऱ्यांना रुपये ३२७.९२ कोटी प्रोत्साहनपर राशी वितरीत करण्यात आली आहे. भंडारा जिल्ह्यातील १८७६ शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशी वितरीत करण्यासाठी कागदपत्रांची तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ब) अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत जाहीर करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.
(४) माहे ऑक्टोबर, २०२५ दरम्यान भंडारा जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली आहे. मदत व पुर्नवसन विभागाच्या दिनांक ०७ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने निधी मंजूर केलेला असून मदत व पुनर्वसन विभागाद्वारे मदत वाटप ऑनलाईन DBT (Direct benefit transfer) पोर्टलद्वारे वितरण करण्यात येत आहे.
(५) व (६) खरीप पणन हंगाम २०२५-२६ करीता प्रोत्साहनपर राशीबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कुलाबा येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीच्या पुनर्बांधणी करणेबाबत

**(४९) * ६८७७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कुलाबा येथील दोन शाळा इमारती सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात धोकादायक घोषित करण्यात आल्यावर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना जनरल पोस्ट ऑफिस समोरील मनोहरदास महानगरपालिका शाळेत तर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कुलाबा येथील महानगरपालिका मार्केट इमारतीत स्थलांतरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या कुलाबा येथील दोन शाळा इमारती धोकादायक झाल्यामुळे रिकाम्या करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले असून दुरुस्तीसाठी गत दीड वर्षे पाठपुरावा करुनही महानगरपालिका प्रशासन सदर शाळा दुरुस्तीकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावित दहा मजली बहुउद्देशीय शाळा इमारतीच्या बांधकामास परवानगी मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शाळांची संरचनात्मक चाचणी करण्यात आली आहे काय, किती इमारती धोकादायक आहेत, किती धोकादायक इमारती रिकाम्या केल्या याबाबतचा सर्वकष अहवाल तसेच धोकादायक इमारतींचा अहवाल महानगरपालिकेने शासनास सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपरोक्त शाळा बंद करण्याच्या निर्णयाची सखोल चौकशी करुन सदर प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कुलाबा येथील दोन शाळेच्या इमारती धोकादायक घोषित करण्यात आल्यावर कुलाबा माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना मनोहरदास मनपा शाळेत तसेच कुलाबा माध्यमिक इंग्रजी शाळेमधील विद्यार्थ्यांना बोराबाजार मनपा शाळेत स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कुलाबा येथील दोन्ही शाळा स्थलांतरीत ठिकाणी नियमित सुरु आहेत.

(३) हे खरे आहे.

या दोन्ही शाळांची एकत्रित पुर्नबांधणी प्रस्तावित आहे. याकरीता आवश्यक परवानगी घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. भारतीय नौदलाच्या संबंधित विभागाने प्रस्तावित दहा मजली इमारतीसाठीची परवानगी नाकारली आहे. परंतु नौदलाशी चर्चा होऊन सद्य:स्थितीतील तळमजला +३ मजले अशा स्वरुपाच्या इमारतीचे आराखडे नौदलाच्या संबंधित विभागास नाहरकतीकरीता सादर करण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.
(५) कुलाबा प्राथमिक मनपा शाळा व कुलाबा माध्यमिक मनपा शाळा या दोन्ही शाळेंची एकत्रित पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने नवीन इमारतीच्या बांधकामाच्या आराखड्यास मंजुरी व परवानग्या मिळवण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गतची विकासकामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(५०)** * **६७१४ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्धापूर (जि.नांदेड) शहरासह तालुक्यातील अनेक ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली सुरु असलेली कोट्यवधी रकमेची विकासकामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झालेली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेकेदाराकडून करण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या कामांकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असून कोट्यवधी रुपयांची विकासकामे निकृष्ट साहित्याने वापरून आणि निकृष्ट पध्दतीने होत असून शासकीय निधीचा अपव्यय होऊन कामांचा टिकाऊपणा धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या ठेकेदार व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
अर्धापूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली सुरु असलेली विकास कामे, कामाच्या वावानुसार विहित पध्दतीने करण्यात आली असून सदर कामांसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्यांच्या चाचण्या दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून करण्यात आल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील सायकल ट्रॅक व स्मार्ट फुटपाथवर बेघर व्यक्तींनी आणि विक्रेत्यांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(५१)** * **६५८८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील त्र्यंबक नाका ते एबीबी सर्कल दरम्यान १६ कोटी रुपये खर्चून साकारण्यात आलेला सायकल ट्रॅक व स्मार्ट पद पथावर बेघर आणि विक्रेत्यांनी अतिक्रमण केले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या या सायकल ट्रॅकचा वापर सायकलचालकांना व पादचाऱ्यांना करता येत नसल्याने, सार्वजनिक निधीचा व शासनाच्या उद्देशाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिव्हिल हॉस्पिटल, शरणपूर रोड सिग्नल आणि मायको सर्कल यांसारख्या प्रमुख भागातील पदपथावर झालेल्या अतिक्रमणांमुळे परिसरात अस्वच्छता वाढून शहराचे विद्रुपीकरण होत असून महानगरपालिका प्रशासनाकडून या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक शहरात १६ कोटी रुपये खर्चून विकसित केलेले सायकल ट्रॅक व स्मार्ट फूटपाथ अतिक्रमणमुक्त करून नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

नाशिक महानगरपालिकेद्वारे यासंदर्भात नियमितपणे विशेष मोहिमा राबविण्यात येत असून या मोहिमांअर्गत आढळणाऱ्या बेघर व्यक्तींना महापालिकेच्या 'बेघर निवारा' केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यात येत आहे. तसेच, रस्त्यावरील विक्रेत्यांचे 'राष्ट्रीय फेरीवाला धोरण' नुसार सर्वेक्षण व नोंदणी करून, त्यांना अधिकृतपणे निश्चित केलेल्या जागांचे वाटप करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

वाहतूक आणि पादचाऱ्यांच्या सुलभ दळणवळणासाठी ट्रॅक व पदपथ (Footpaths) अतिक्रमणमुक्त करून ते वापरासाठी मोकळे करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

संबंधित क्षेत्राची स्वच्छता नियमितपणे करण्यात येत आहे. शहराचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी आणि अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी नाशिक महानगरपालिका प्रशासनामार्फत सातत्याने मोहिमा राबविण्यात येत आहेत.
(४) सायकल ट्रॅक व स्मार्ट फुटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी नाशिक महानगरपालिका प्रशासनामार्फत सातत्यपूर्ण मोहिमा घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.